रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ८३
www.ramprahar.com
बुधवार, ९ ऑक्टोबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

पनवेलच्या वलपमध्ये महिलेची हत्या करून ऐवज लांबवला/२
खोपोली बायपासजवळ तीन अपघातांमध्ये दोघे जखमी/५
नागोठण्यात शेकाप सरपंच, उपसरपंच, सदस्य भाजपमध्ये/७

## काँग्रेससाठी अनेक राज्यांकडून नो एण्ट्रीचा बोर्ड -पीएम मोदी



**नवी दिल्ली** : हरियाणा विधानसभा निवडणूक भाजपने सलग तिसर्‍यांदा जिंकली आहे. भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील भाजप मुख्यालयात भाषण करताना हरियाणातील विजय ऐतिहासिक असून या विजयाने आपल्याला खूप आनंद झाला आहे, असे सांगून काँग्रेससाठी अनेक राज्यांनी नो एण्ट्रीचा बोर्ड लावला आहे, असा टोला लगावला तसेच काँग्रेसचा डबा गुल झाला असून पितळ उघडे पडले आहे, अशी बोचरी टीकाही केली. यासोबत जम्मू काश्मीरच्या निकालाचाही मी सन्मान करतो, असेही म्हटले आहे. आपल्या देशात अनेक राज्ये अशी आहेत, ज्यांनी कधीही काँग्रेसला सलग दोनदा सत्ता दिली नाही, पण भाजपवर तो विश्वास टाकला. हरियाणामध्ये भाजपला तिसर्‍यांदा सत्ता दिली. लोकांनी काँग्रेसला नाकारले आहे, असे सांगत पंतप्रधान मोदींनी जनतेचे आभार मानले.

## माणगावमध्ये आज लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा; मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती

**माणगाव : प्रतिनिधी**

लाडक्या बहिणींना हक्काचं माहेर... दरमहा मिळणार मानाचा अहेर... असा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा बुधवारी (दि. ९) दुपारी २ वाजता माणगावजवळील निळगुण फाटा येथील भव्य मैदानावर होणार आहे. या सोहळ्याची जोरदार तयारी करण्यात येणार आहे.

या सोहळ्यास राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, राज्याचे उद्योगमंत्री व रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे व श्रीरंग बारणे,



आमदार सर्वश्री प्रशांत ठाकूर, रविशेठ पाटील, भरत गोगावले, महेश बालदी, महेंद्र थोरवे, महेंद्र दळवी, निरंजन डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्याची जय्यत तयारी प्रशासनातर्फे तसेच महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून करण्यात आली आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री हेलिकॉप्टरने माणगावला येणार असल्याने शासकीय विश्रामगृहासमोरील प्रशस्त जागेत हेलिपॅड तयार करण्यात आले आहे तसेच माणगाव नगरीत व परिसरात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळ्याचे बॅनर व महायुतीचे झेंडे लावण्यात आले आहेत. शिवाय अनेक ठिकाणी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या स्वागताचे बॅनर झळकत आहेत. या कार्यक्रमास महिलांनी, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थितीत रहावे, असे आवाहन रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

# हरियाणात भाजपची विजयी हॅट्ट्रिक

## विधानसभा निवडणुकीत स्पष्ट बहुमत; जम्मू काश्मिरमध्येही 'कमळा'ला बळ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रातल्या सत्तेप्रमाणेच हरियाणातही जवळपास सहा दशकांनंतर भाजपच्या रूपात कुठल्याही पक्षाला सलग तिसर्‍यांदा सत्ता मिळाली आहे. राजकीय अभ्यासक आणि निवडणूकपूर्व मतांचे कल या सार्‍याचा अंदाज चुकवत मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांनी हरियाणात भाजपचा विजय साकार केला. दुसरीकडे जम्मू काश्मिरमध्ये काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीने विजय मिळवला असला तरी तेथे भाजपमध्ये मुसंडी घेत लक्ष वेधले आहे.

हरियाणात मंगळवारी (दि. ८) सुरुवातीला जोरदार उसळी मारणार्‍या काँग्रेसला अवघ्या दोनच तासात भाजपने पिछाडीवर सोडले आणि मतमोजणीच्या प्रत्येक फेरीनंतर यशस्वी घोडदौड केल्याचे दिसले. हाती आलेल्या कलानुसार अंतिम निकालात भाजपने ९०पैकी सर्वाधिक ४८ जागा जिंकल्या. लोकसभा निवडणुकीनंतर ही पहिलीच विधानसभा निवडणूक असल्याने या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष होते. भाजपने दमदार कामगिरी करीत 'कमळ' फुलवले. या विजयाचे सगळे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जाते, अशा भावना मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केल्या.

जम्मू-काश्मिरमध्ये ९० जागांपैकी काँग्रेस-नॅशनल कॉन्फरन्स आघाडीने ४९ जागांवर विजय मिळवला, तर भाजपने एकट्याने २९ जागांवर बाजी मारली. महबूबा मुफ्ती यांच्या पीडीपीला अवघ्या तीन जागा मिळाल्या.



**हरियाणाच्या लोकांनी तिसर्‍यांदा भाजपवर विश्वास दाखवला आहे. आम्ही यापुढेही पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली वाटचाल करू. माझ्या राज्यातील गोरगरीब जनता, शेतकरी बांधव आणि युवावर्ग असाच माझ्या पाठिशी कायम उभा राहिल याची मला खात्री आहे.**
**-नायब सिंग सैनी,**
**मुख्यमंत्री, हरियाणा**

### भाजपच्या मुसंडीने महायुतीमध्ये जल्लोष; 'मविआ'त धाकधूक

**मुंबई** : हरियाणात भाजपला घवघवीत यश मिळाल्याने महाराष्ट्रात भाजपने जल्लोष केला. जम्मू-काश्मीरमध्येही भाजपची सत्ता आली नसली तरी तिथे त्याच्या जागांमध्ये वाढ झालीय. यामुळे भाजप महायुतीचा आत्मविश्वास वाढला आहे. लोकसभेतील फेक नरेटीव्हचे उत्तर आता थेट नरेटीव्हने दिलेय, असा टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निकालानंतर विरोधकांना लगावला. आता महाराष्ट्रातही महायुतीचा असाच विजय होईल, असा भाजप महायुतीला विश्वास वाटतोय, तर दुसरीकडे महाविकास आघाडीमध्ये या निकालाने धाकधूक सुरू झाली असल्याचे चित्र आहेत. त्यामुळे 'मविआ'तून वेगवेगळ्या प्रतिक्रिया समोर येत आहेत.

### विकासकामांचा शुभारंभ



**पनवेल : येथील महापालिकेच्या वतीने कोट्यवधी रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण मंगळवारी झाले. या सोहळ्यास खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप शहराध्यक्ष अनिल भगत, शिवसेनेचे रामदास शेवाळे यांच्यासह माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या विकासकामांमुळे महापालिका हद्दीतील नागरिकांना भविष्यात आणखी सोयीसुविधा उपलब्ध होणार आहेत.** (वृत्त उद्याच्या अंकात)

## निवडक

### बालवाडीत शिकणार्‍या चिमुरडीवर शाळेच्या टॉयलेटमध्ये अत्याचार

**परभणी** : येथे एलकेजीत अर्थात बालवाडीत शिकणार्‍या विद्यार्थिनीवर शाळेतील स्वच्छतागृहात अत्याचार करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. मुलीला त्रास होत असल्याने रुग्णालयात नेण्यात आले असता डॉक्टरांनी तपासणी केल्यावर मुलीवर अत्याचार झाल्याचे पुढे आले. या प्रकरणी सोनपेठ पोलीस ठाण्यात पोक्सोसह इतर कलमांखाली अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंद झाला असून अधिक तपास सुरू आहे, तर मुलीची प्रकृती खालावल्याने तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान

**नवी दिल्ली** : बॉलीवूडमधील डान्सिंग सुपरस्टार मिथुन चक्रवर्ती यांना सिनेजगतातील सर्वात प्रतिष्ठित दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्कार मंगळवारी (दि. ८) प्रदान करण्यात आला. दिल्लीत ७०वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा पार पडला. त्या वेळी मिथुनदा यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या पुरस्काराने सम्मानित करण्यात आले.

## आगामी निवडणुकीतही आमदार प्रशांत ठाकूर यांना विजयी करा

### ■ भाजप नेते दयानंद सोपटे यांचे आवाहन

**तळोजा : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघातून तीन वेळा आपण आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर विश्वास दाखवून त्यांना विजयी केले आहे. आमदारांनीही तो विश्वास सार्थ केला आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीतही त्यांना भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन भाजपचे गोवा प्रदेश महामंत्री, माजी आमदार दयानंद सोपटे यांनी तळोजा येथे महिलांसाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमात केले.



महाराष्ट्रातील भगिनींसाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केल्यानंतर महिलांकडून सरकारच्या या योजनेचे स्वागत केले जात आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल विधानसभा क्षेत्रातील सर्वच महिला भगिनींसाठी खेळ पैठणीचा आणि लकी ड्रॉ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत सोमवारी (दि. ७) तळोजा येथे हा कार्यक्रम झाला. त्या वेळी सोपटे बोलत होते.

या कार्यक्रमास भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, संध्या शरबिद्रे, प्रतिभा भोईर, शिल्पा म्हात्रे, महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्ष कमला देशेकर, दिनेश खानावकर, प्रकाश खैरे, गोनीनाथशेठ पाटील, निर्दोष केणी, सागर मोरे, नितीन भोईर, रमेश मढवी, प्रतीक्षा केणी,



विजश्री पाटील, समीना साठी, अमृत पाटील, सविता फडके, उज्वला साळुंखे, नंदू म्हात्रे, आशा बोरसे, संतोष पाटील, राम पाटील, कृष्णा पाटील, लीना म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या वेळी महिलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये उषा म्हात्रे, चंद्रभागा पाटील, कोमल कदम, मनीषा शेगर, जागृती सांगळे, गंगादेवी, प्राप्ती शेलार, अचल मढवी, देवई महानवर, रूपाली पाटील या विजयी झाल्या. त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

## विचुंबे पुलाचे मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते आज लोकार्पण; विविध रस्त्यांच्या कामाचेही होणार भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील विचुंबे गावाजवळ गाढी नदीवर उभारण्यात आलेल्या नवीन पुलाचे लोकार्पण राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि. ९) सायंकाळी ४ वाजता होणार आहे.

या कार्यक्रमास भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

या पुलासाठी कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर व सहकार्‍यांनी प्रयत्न व पाठपुरावा केला होता. त्यानुसार मंत्री रवींद्र चव्हाण यांनी मान्यता देत काम पूर्णत्वास नेले आहे. या पुलामुळे नवीन पनवेल ते विचुंबे, पाली देवद, उसर्ली, शिवकर, मोहो पाली असा प्रवास करणार्‍यांना मोठा दिलासा मिळणार आहे. या पुलाच्या लोकर्पणासह विचुंबे अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण, विचुंबे पोलीस चौकी ते सारनाथ बुद्धविहारकडे तसेच बौद्धवाडा ते ग्रीन व्हॅलीपर्यंत जाणार्‍या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजनसुद्धा होणार आहे.

## बिग बॉस विजेता सुरज चव्हाण जेजुरीत

### खंडेरायाचे घेतले दर्शन अन् उधळला भंडारा

**पुणे : प्रतिनिधी**

बिग बॉस मराठी सीझन ५चा विजेता सुरज चव्हाण याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. त्याने मंगळवारी (दि. ८) अखंड महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या खंडेरायाचे दर्शन घेतले.

बिग बॉसची ट्रॉफी घेतल्यानंतर सुरज चव्हाण जेजुरीला पोहचला. खरंतर अनेकदा बिग बॉसमध्ये असताना सुरजने जेजुरीच्या खंडेरायाचा उल्लेख केला होता. त्यानंतर प्रत्यक्षात ट्रॉफी जिंकल्यानंतर तो थेट जेजुरीत पोहचला. या वेळी त्याने पूजा करून खंडेरायाच्या चरणी मनोभावे भंडारा उधळला.



### रीलस्टार ते बिगबॉस विजेता

बुक्कीत टेंगूळ आणि झापुक झापुक स्टाईलने बारामतीचा सुरज चव्हाण विजेता ठरला. तो बिग बॉसमध्ये येण्यास उत्सुक नव्हता, पण बिग बॉसच्या टीमने शेवटी त्याला घरामध्ये आणले. त्यानंतरही सूरज अडखळताना दिसला. त्याला गेम समजत नाही, अशी टीकाही त्याच्यावर होत होती, पण नंतर तो रूळला आणि महाराष्ट्रातल्या प्रेक्षकांनी भरभरून दिलेल्या पाठिंब्यावर सुरजने अखेर बिग बॉसच्या पाचव्या सीजनच्या ट्रॉफीवर नाव कोरले. त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव सुरू आहे.

## ज्येष्ठ पत्रकार नीला उपाध्ये यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

येथील ज्येष्ठ पत्रकार, चित्रपट समीक्षक, लेखिका



आणि गरवारे मराठी पत्रकारिता वर्गाच्या संस्थापिका व माजी वर्ग-समन्वयक नीला वसंत उपाध्ये यांचे सोमवारी (दि. ७) रात्री १०.२०च्या सुमारास चेंबूर येथे निधन झाले. त्या ७९ वर्षांच्या होत्या. त्यांच्या मागे मुलगी, मुलगा, जावई, सून आणि नातवंडे असा परिवार आहे.

'महाराष्ट्र टाइम्स'मधील प्रदीर्घ कारकिर्दीत नीलाताईंनी अनेक विषयांवर लिखाण केले. त्यांची विविध पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अखेरपर्यंत सक्रिय आणि लिहित्या राहिलेल्या त्या मराठी पत्रकारितेतील प्रेरणादायी व्यक्तिमत्व होत्या. पत्रकार संघाच्या त्या आजीव सदस्य तसेच 'कोमसाप'च्या सक्रिय सदस्य होत्या.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नीला उपाध्ये यांना श्रद्धांजली वाहिली. चेंबूरच्या चरई विद्युत दाहिनीत नीलाताईंवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### झंकार नवरात्रोत्सव



**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास सोसायटी मित्र मंडळ आयोजित झंकार नवरात्रोत्सव मोठ्या जल्लोषात सुरू आहे. यानिमित्ताने शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानावर होत असलेल्या दांडियाला रसिकांचा उत्तम प्रतिसाद लाभत असल्याचे दिसून येत आहे.**

# वीज वितरण यंत्रणेचे सक्षमीकरण



## २७७३ कोटींच्या कामांचा शुभारंभ

**सोलापूर : प्रतिनिधी**

राज्यातील २४२ शासकीय व सहकारी उपसा जलसिंचन योजनांच्या सौर ऊर्जीकरण प्रकल्पांचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री मा. अजित पवार यांच्या हस्ते सोलापूर येथे करण्यात आले. त्याचसोबत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतील वीज शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी पायाभूत वीज वितरण यंत्रणेच्या सक्षमीकरण व विस्तारीकरणासाठी २७७३ कोटी रुपयांच्या विविध कामांचा शुभारंभ करण्यात आला.

या कार्यक्रमाला आमदार सुभाष देशमुख, आमदार विजय देशमुख, आमदार शहाजी पाटील, आमदार संजयमामा शिंदे, आमदार समाधान आवताडे, आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि आमदार राम सातपुते, माजी खासदार जयसिद्धेश्वर महास्वामी तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र आणि महावितरणचे संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपसा जलसिंचन योजनांना सौर ऊर्जेद्वारे वीजपुरवठा व्हावा आणि किफायतशीर दरात वीज उपलब्ध व्हावी यासाठी या योजनांचे सौर ऊर्जीकरण करण्याच्या कामाला आज सुरुवात झाली. यासाठी राज्य सरकारने ३३६६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध केला आहे. उपसा जलसिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण करण्यासाठी राज्याचा ऊर्जा विभाग, महावितरण आणि जलसंपदा विभाग सहकार्याने काम करत आहे. जलसंपदा विभागाने सौर ऊर्जीकरण प्रकल्पांसाठी साडेतीन हजार एकरपेक्षा अधिक जमीन उपलब्ध करून दिली आहे. या योजनेत ९०५ मेगावॅट इतकी सौर ऊर्जानिर्मिती क्षमता निर्माण होणार आहे.

टेंभू, जिहे कठापूर, ताकारी, लोअर वर्धा, अप्पर प्रवरा अशा सर्व लहानमोठ्या उपसा सिंचन प्रकल्पांना आता सौर ऊर्जेद्वारे निर्माण झालेली वीज उपलब्ध केली जाईल. विशेष बाब म्हणजे १२० सहकारी उपसा सिंचन योजनांचेही सौर ऊर्जीकरण या योजनेत करण्यात येणार आहे. आगामी दोन वर्षात ही कामे पूर्ण होतील. राज्याच्या ऊर्जा क्षेत्रातील आणि सिंचन क्षेत्रातील हे ऐतिहासिक पाऊल आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत सध्या ९२०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीचे काम सुरू आहे. या योजनेतून मोठ्या प्रमाणात वीज निर्माण होणार आहे. शेतकऱ्यांपर्यंत वीज पोहचविण्यासाठी आरडीएसएस योजनेअंतर्गत पायाभूत सुविधा बळकटीकरण करण्यासाठी शासनाने ३००० कोटी रुपयांची कामे मंजूर केली आहेत. पश्चिम महाराष्ट्र, कोकण व उत्तर महाराष्ट्रातील १६९७ कोटी रुपयांच्या कामांचा शुभारंभ आज झाला. यामध्ये ९० नवी वीज उपकेंद्रे उभारणे, २३८ ठिकाणी पॉवर ट्रान्सफॉर्मर क्षमता वाढ आणि १,७०५ किलोमीटर लांबीच्या ३३ केव्हीच्या उच्च दाब वाहिन्या बसविणे अशा कामांचा समावेश आहे.

याखेरीज एआयआयबी योजनेअंतर्गत १०७६ कोटी रुपयांची पायाभूत सुविधा बळकटीकरणाची कामेही सुरू करण्यात येत आहेत. त्यामध्ये ६० नवीन वीज उपकेंद्रे, ३१ पॉवर ट्रान्सफॉर्मर क्षमतावाढ, १४३३ किलोमीटर लांबीच्या ३३ केव्हीच्या उच्च दाब वाहिन्या बसविणे, अशीही कामे हाती घेण्यात येत आहेत.

या कार्यक्रमात सोलापूर तालुक्यातील महिला शेतकरी महानंदा तेली व द्वारकाबाई गुरव यांना मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेतून कृषिपंपांचे वीजबिल शासनाने भरल्याची पावती उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री मा. अजित पवार यांच्याहस्ते प्रदान करण्यात आली. या वेळी महावितरणचे कार्यकारी संचालक सुनील पावडे, पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंता अंकुश नाळे आणि अधीक्षक अभियंता सुनील माने उपस्थित होते.

# माणगाव ते दिघी मार्गावर आज अवजड वाहनांना बंदी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

लाडकी बहिण योजना आणि महिला सशक्तीकरण अभियान आंतर्गत रायगड जिल्ह्याचा मुख्य सोहळा बुधवारी (दि.९) माणगाव तालुक्यातील मोर्बा येथे होणार आहे. या सोहळ्यासाठी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यासाठी जिल्ह्यातील विविध भागातून हजारो महिला येणार असल्याने, माणगाव ते दिघी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ एफ वर अवजड वाहतूकीस बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी याबाबतची अधिसूचना जारी केली आहे.

मोर्बा येथील कार्यक्रमाकरीता मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमाकरीता ८०० ते ९०० बसेस व इतर लहान मोठी अशी वाहने येण्याची शक्यता आहे. हा कार्यक्रम मोर्बा, ता. माणगांव गावचे हद्दीत रोडजवळील मैदानावर माणगाव ते दिघी येथे जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ (एफ) च्या बाजूला असणाऱ्या मैदानावर होणार आहे. या रोडवर जड-अवजड वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. अशावेळी या मार्गावरून जड-अवजड वाहतूक सुरू राहिल्यास वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होवून कार्यक्रमाच्या वेळी गंभीर प्रश्न उद्भवू शकतो.

महामार्गावर अपघात होवू नये तसेच कार्यक्रमाकरीता येणारे नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून उपाययोजना करणे तसेच महाराष्ट्र शासनाच्या महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रमाचे अनुषंगाने जड-अवजड वाहनांमुळे जागोजागी वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून ९ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ६ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत रायगड जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ (एफ) यावर म्हसळा ते माणगाववरून होणारी ट्रेलर, कंटेनर, ट्रक/डंपर व इतर सर्व अशी अवजड वाहने ज्याची क्षमता १६ टन किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा सर्व जड-अवजड वाहनांकरिता जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी वाहतूक बंदी अधिसूचना जारी केली आहे.

या वेळी अवजड वाहनांना पर्यायी मार्ग म्हणून १) म्हसळा मांदाड तळामार्गे रोहा नागोठणे, २) म्हसळा साई- तळेगाव तळा - इंदापुर व ३) म्हसळा साई चेकपोस्ट कनघर खामगाव- पुरार फाटा- गोरेगांव मार्गे मुंबई बाजुकडे व गोवा बाजूकडे जाणाऱ्या मार्गावरून वाहतूक करण्याबाबत या अधिसूचनेमध्ये नमूद करण्यात आले आहे.

ही वाहतूक बंदी अधिसूचना ही दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला इत्यादी जीवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड वाहने रुग्णवाहीका, तसेच महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रमासाठी येणारी वाहने यांना लागू राहणार नाही.



**पनवेल : रायगड जिल्हा परिषदेच्या शेलघर येथील शाळेत विद्यार्थ्यांना शासनाकडून आलेले गणवेश सोमवारी वाटप करण्यात आले. या वेळी गावचे अध्यक्ष अमृतशेठ भगत तसेच माजी ग्रामपंचायत सदस्य अॅड. योगिता भगत, सुहास भगत, योगेश भगत, प्रल्हाद भगत आदी उपस्थित होते.**

# वलपमध्ये महिलेची हत्या; दागिन्यांसह ऐवज लांबवला

**पनवेल : वार्ताहर**

सोन्याच्या दागिन्यांसाठी महिलेची हत्या करण्यात आल्याचा प्रकार पनवेल तालुक्यातील वलप गावाच्या परिसरात घडला आहे.



आर्चित किराणा दुकानाजवळील कच्च्या रस्त्यावर संगीता राजेंद्र आगवणे (वय ४९ रा.गणेशनगर, वलप) यांचा मृतदेह त्यांच्या मुलाला आढळून आला. मंगळवारी त्या सकाळी खासगी शिकवणी घेऊन घरी येताना कोणीतरी अज्ञाताने त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने, मोबाईल फोन व पर्स असा एकूण एक लाख ९५ हजार ८५२० रुपयांच्या वस्तू जबरीने काढून घेण्याच्या उद्देशाने गळा आवळला. सोन्याचे दागिने जबरी चोरी करून त्यांचा खुन करून तो पसार झाला आहे.

या घटनेची माहिती मिळताच तालुका वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील, निरीक्षक जगदीश शेलकर व पोलिसांचे पथकाने घटनास्थळी रवाना होवून त्यांनी अज्ञात आरोपीचा शोध सुरू केला आहे.

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४चा निकाल घोषित

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि पु.ल. देशपांडे कला अकादमीच्या वतीने घेण्यात आलेल्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४चा निकाल घोषित करण्यात आला आहे.

राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार भारत माता गणेश मंडळ, देवनांदरा,जि. परभणी, द्वितीय पुरस्कार जय भवानी मित्र मंडळ, ठाणे व तृतीय पुरस्कार वसुंधरा वृक्षरुपी गणेशोत्सव, लातूर यांना जाहीर झाला आहे. राज्यातील पहिला क्रमांकाच्या उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळास पाच लाख, द्वितीय क्रमांकास दोन लाख ५० हजार आणि तृतीय क्रमांकास रुपये एक लाख इतक्या रकमेचे पारितोषिक, सन्मानाचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. याशिवाय उर्वरित ३३ जिल्ह्यांसाठीही जिल्हा निहाय पारितोषिक विजेते जाहीर करण्यात आले आहेत. जिल्हास्तरीय पारितोषिकाचे स्वरूप रुपये २५००० प्रत्येकी, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र असे आहे.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ सुधीर मुनगंटीवार, मंत्री, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षीय उपस्थितीत आणि हस्ते बुधवारी (दि.९) करण्यात येणार आहे. यशवंत नाट्यमंदिर, माहीम, मुंबई -१६ येथे दुपारी बारा वाजता हा पारितोषिक वितरण समारंभ असून शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, खासदार अनिल देसाई आणि आमदार सदा सरवणकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या वेळी साईलीला कला मंच व विनायक पुरुषोत्तम लिखित व दिग्दर्शित, महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम कलाकार निखिल बने व निमिष कुलकर्णी यांचे सादरीकरण असलेला 'नमन गणेशा' हा सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले आहे.

# आदर्श पतसंस्थेतर्फे नेत्रतपासणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या अलिबाग शाखेचा २६वा वर्धापनदिन सोमवारी (दि.७) साजरा करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त लायन्स क्लब अलिबाग यांच्या सहकार्याने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी आदर्श पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील, आदर्श पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील, संचालक अनंत म्हात्रे, सतीश प्रधान, भगवान वेटकोळी, विलाप सरतांडेल, जगदीश पाटील हे उपस्थित होते. तसेच लायन्स क्लब, अलिबागचे प्रकाश देशमुख, मनोज ढगे, परेश भटेजा, विराज ढगे, कल्पेश थळे हे उपस्थित होते.



या नेत्र तपासणी शिबिरात ११० रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. त्यातील १५ जणांच्या डोळ्यात मोतिबिंदू आढळून आले. या १५ जणांच्या डोळ्यांवर आदर्श पतसंस्थेतर्फे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

आदर्श पतसंस्था नेहमीच अशा प्रकारची मोफत नेत्र शिबिरे लायन्स क्लब अलिबाग यांच्या मार्फत घेत असते. आजपर्यंत या माध्यमातून संस्थेने जवळपास ६०० रुग्णांवर शस्त्रक्रिया करून त्यांना दृष्टी दिली आहे, अशी माहिती आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी दिली.

## निवडक

### मुलीच्या बदनामीप्रकरणी गुन्हा

**पनवेल :** भागात राहणाऱ्या आणि इयत्ता बारावीत शिक्षण घेत असलेल्या दोन विद्यार्थ्यांनी एका १५ वर्षीय शाळकरी मुलीचे मॉर्फिंग करून तयार केलेले अश्लिल फोटो शाळेच्या इन्स्ट्राग्राम ग्रुपवर व्हायरल केल्याची घटना उघडकीस आली आहे. पनवेल तालुका पोलिसांनी या प्रकरणी दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांविरोधात आयटी अॅक्टसह पोक्सो तसेच बदनामीकारक माहिती प्रसिध्द केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील तपासाला सुरुवात केली आहे.



**उरण : तालुक्यातील जासई येथील हिम्मत नगरी सार्वजनिक नवरात्र मंडळाच्या देवीचे कामगार नेते सुरेश पाटील यांनी दर्शन घेतले. या वेळी मंडळाचे अध्यक्ष विशाल म्हात्रे यांनी स्वागत केले. सोबत प्राचार्य अरुण घाग, भाजपचे जेएनपीए टाऊनशीप अध्यक्ष डी.पी. सोनावणे, नुरा शेख, राजू मराठा राजस्थान आदी उपस्थित होते.**



**कामोठे : येथील सेक्टर १८समोरील एसटीपी प्लान्टच्या समोरील मुख्य मलनिस्सारण वाहिनीचे काम करण्यात आले आहे. या कामी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी मनपा आयुक्तांकडे निवेदनाद्वारे पाठपुरावा केला होता. कार्यवाहीसाठी सहाय्यक आयुक्त वैभव विधाते यांनी विशेष लक्ष घातले.**

# सुभाष मानकर यांचे गडकोट किल्ल्यांचे २०० ट्रेक पूर्ण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुळशी तालुक्यातील दुर्गम डोंगर भागातील अंबवणे या गावातील व पनवेलमधील गड किल्ल्यांचा ट्रेकर शिवदुर्ग संवर्धन प्रतिष्ठान अहमदनगरच्या सुभाष मानकर यांनी गड किल्ल्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी आतापर्यंत २०८ किल्ल्यांचा ट्रेक पूर्ण केला आहे. ते सद्या सीकेटी शाळेचे मुख्याध्यापक आहेत.



गड किल्ल्यांवर जाऊन त्यांनी वाढलेले गवत, प्लास्टिक जमा करणे, गड किल्ल्यांची सफाई साफसफाई अशा मोहिमांमध्ये सहभाग घेतला आहे. मानकर यांनी सप्टेंबर महिन्यात कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील जवळजवळ २७ किल्ल्यांना भेटी देत २०० किल्ल्यांचा ट्रेक पूर्ण केला. प्रत्येक महिन्याला एक ट्रेकचे नियोजन केले जाते असे ते सांगतात. त्यांनी आतापर्यंत पुणे, रायगड, ठाणे, सातारा, नाशिक,पालघर, कोल्हापूर, धुळे, जळगाव, गोवा, कर्नाटक, गुजरातच्या किल्ल्यांचे भ्रमण केले आहे. किल्ल्यांचा अनमोल ठेवा पुढील पिढीला प्रेरणादायी ठरावा याकरिता सोशल मीडियातून प्रत्येक गडकोट किल्ल्यांचे फोटो व त्याची माहिती पोहचवण्याचे कार्य ते करत आहेत.

# स्व. गजाननबुवा पाटील सभागृहाचे लोकार्पण आणि पुतळ्याचे अनावरण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधील प्रती पंढरपूर-आळंदीच्या परिसरात भजन भूषण स्व. गजाननबुवा पाटील सभागृहाचे लोकार्पण व त्यामधील त्यांच्या पुतळ्याच्या अनावरण समारंभाचे आयोजन काल सायंकाळी करण्यात आले होते. आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते सभागृहाचे लोकार्पण व पुतळ्याचे अनावरण करण्यात आले.

या वेळी ह. भ. प. मारुती महाराज राणे, ह. भ. प. कृष्णा महाराज लांबे, रंभाजीबुवा पाटील, शहापूरचे माजी सभापती उल्हास बांगर, माजी बांधकाम सभापती पुंडलिक पाटील, स्मारक समितीचे अध्यक्ष दीपकबुवा करोडे, माजी उपसभापती मनोहर थोरवे, माजी नगराध्यक्ष वसंत भोईर, जिल्हा प्रमुख संतोष भोईर, उप जिल्हा प्रमुख भाई गायकर, किसान सेल प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे, भाजपा तालुकाध्यक्ष राजेश भगत, शिवराम बदे, पंकज पाटील, प्रसाद थोरवे, संकेत भासे, सुचिता वांजळे आदी उपस्थित होते.

प्रसादबुवा पाटील, महेंद्र निगुडकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. दीपकबुवा करोडे यांनी प्रास्ताविक केले. किशोर कुलकर्णी यांनी बुवांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे किस्से सांगितले.

या वेळी शिल्पकार नाना कारेकर, मृदुंगमणी प्रतापबुवा पाटील, प्रशांत दीक्षित, वसंत पाटील, प्रवीण गांगल, शिरीष दिघे, जयेश शेलार, आदींसह काही संस्थांचा विशेष सत्कार करण्यात आला. डॉ. नितीन आरेकर यांनी सूत्रसंचालन केले. रविंद्र लाड यांनी आभार मानले.

या वेळी सदाशिव थोरवे, वनिता म्हसे, विजय हांडे, संदीप भोईर, अमर मिसाळ, रंभाजीबुवा थोरवे, नामदेव मोरे, मीना थोरवे, शैला विशे, संगीता पवार, मनीषा थोरवे, अशोक शिंदे, सुनील देशमुख, शरद म्हसे, सूर्याजी ठाणगे, अशोक थोरवे, समीर सोमणे, शैलेश हनुमंते, शिरीष दिघे, चिंतामणी पाटील, ईश्वर आरेकर, विजय बेडेकर, जनार्दन भासे, अरुण निघोजकर, मनोहर ठाकरे, संतोष वैद्य, रमेश विशे, समीर चव्हाण, अमोल देशमुख, मनीषा भासे, लीला चंदन, तेजस विशे आदी उपस्थित होते.

# सिंधुदुर्ग रहिवासी संघाची सभा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघाची ३७ वी सर्वसाधारण सभा रविवारी (दि.६) नवीन पनवेल येथील सरकारी नोकरदार संकुलातील सभागृहात झाली.

सभाध्यक्ष रामकृष्ण (भाई) परब यांनी सभेला मार्गदर्शन करत सध्य कमेटीच्या कार्याचा गौरव केला. अध्यक्ष केशव राणे यांनी संघ कार्याविषयी आणि पुढील नियोजित कार्यक्रम यांचा आढावा घेतला.

उपाध्यक्ष संतोष चव्हाण यांनी सभेचा वार्षिक आर्थिक अहवाल वाचून सभेची मंजुरी घेतली. खजिनदार दीपक तावडे, सह खजिनदार बाबाजी नेरुरकर यांनी वार्षिक अहवाल केला. उपाध्यक्षा प्रिया खोबरेकर यांनी महिला मंडळाच्या विविध उपक्रमाची माहिती दिली. प्रिता भोजने, धनश्री धुरी, विजया सावंत, विद्या इंदप, संध्या मिराशी यांचे मार्गदर्शन व सहकार्य असते हे नमूद केले.

स्मिता चव्हाण यांनी मोफत गर्भाशय कॅन्सर लस इनरव्हील क्लब सौजन्याने उपलब्ध करून देऊ, असे सांगितले. भजन मंडळ प्रमुख प्रदीप रावले, विवाह मंडळ चालक वासुदेव सावंत, बाबू दळवी, किशोर सावंत यांचे आभार मानले. ज्येष्ठ सदस्य चंद्रकांत चव्हाण, मनोहर मराळ, शाम वालावलकर यांनी मार्गदर्शन केले. सचिव रामचंद्र मोचेमाडकर यांनी आभार मानले.



# डिझेल, टायर चोरणारी टोळी गजाआड

## नवी मुंबई गुन्हे शाखेकडून म्होरक्यासह आठ जणांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयासह इतर विविध ठिकाणी डिझेलसह वाहनांचे टायर चोरी करणाऱ्या टोळीच्या म्होरक्यास त्याचे साथीदार अशा एकूण आठ जणांच्या टोळीस नवी मुंबई गुन्हेशाखेने जेरबंद केले आहे.

याप्रकरणी पोलिसांनी टोळीचा म्होरक्या सलमान कलदाणी याच्यासह कमल चंद्रपाल राठोड, शेरसिंग नरफतसिंग राठोड, आकाश चव्हाण, रवी सोनकांबळे, अविनाश चव्हाण, फिरोज नासीर कलदाणी, जुनेद शेख (सर्व रा. कोपरखैरणे) व अशोक मस्के उर्फ कांचा (रा.जुहूगाव, वाशी) अशा आठ जणांना अटक केली आहे.

यातील टोळीचा म्होरक्या याच्याविरोधात नवी मुंबईतील पनवेल, उरण, एपीएमसी, कोपरखैरणे, कामोठे व रायगडमधील रसायनी, खोपोली व नागोठणे पोलीस ठाण्यात अशा स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. नवी मुंबईत रस्त्याच्या कडेला पार्किंग करुन ठेवलेल्या ट्रेलर व कंटेनरचे चालक झोपले असल्याचे पाहून किंवा वाहनाजवळ कोणीही नसल्यास अशा वाहनांमधील डिझेलसह वाहनांचे टायर चोरी करण्याच्या घटनांबाबतच्या तक्रारी वाहतूकदारांकडुन पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आल्या आहेत.

डिझेल चोरीसह वाहनांचे टायर चोरीच्या या वाढत्या घटनांमुळे वाहतूकदारांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. त्यामुळे या गुन्हयातील टोळीचा बंदोबस्त करण्याचे आदेश नवी मुंबईचे पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार गुन्हेशाखेचे सहाय्यक पोलिस आयुक्त अजयकुमार लांडगे, यांनी दिलेल्या गोपनीय माहितीवरून डिझेल चोरीच्या गुन्ह्यातील म्होरक्या सलमान नासीर कलदाणी, (वय २९ रा. रियान अपार्टमेण्ट, से-१२, बोनकोडेगाव) यांस गुन्हे शाखा कक्ष ०२ च्या पोलीस पथकाने सापळा रचून त्याच्यासह सहकाऱ्यांना बेड्या ठोकल्या आहेत.

यातील आरोपी सलमान नासीर कलदाणी व त्याचे साथीदार कारने जेएनपीटी रोड, खारघर, पनवेल, वाशी, घोडबंदर रोड इत्यादी ठिकाणी फिरुन रस्त्याच्या कडेला पार्किंग करुन ठेवलेल्या ट्रेलर किंवा कंटेनरवरील चालक झोपला असल्याचे किंवा वाहनाजवळ कोणीही नसल्याचे पाहून ट्रकच्या डिझेल टाकीमध्ये पाईप टाळून ते सोबत आणलेल्या कॅनमध्ये भरून डिझेल चोरी करण्याचा गोरखधंदा करत होते व यासाठी सेल्फ ड्राईव्ह कार किंवा झुम कार या मोबाईल अॅप्लीकेशनद्वारे कार भाड्याने घेवून त्या कारचा वापर डिझेल चोरी तसेच टायर चोरी करण्यासाठी ही टोळी करत असल्याचे पोलीस तपासातून समोर आले आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी, पोलीस उपनिरीक्षक मानसिंग पाटील यांच्यासह पोलीस हवालदार रूपेश पाटील, सागर रसाळ आदींच्या पथकाने ही कामगिरी पार पाडली आहे.

## डबक्यात पडून मुलाचा मृत्यू

**पनवेल :** पाण्याच्या डबक्यात पडून मुलाचा मृत्यू झाल्याची घटना करंजाडे वसाहतीत घडली. करंजाडे वसाहतीमधील सेक्टर ४ साईबाबा मंदिर परिसर स्मशानभूमीजवळ एका पाण्याच्या डबक्यात सोहेल रमजान अन्सारी (वय १२) हा पोहण्यासाठी गेला असता त्याला पाण्याचा अंदाज न आल्याने तो बुडून मृत्यू पावला. या घटनेची नोंद अकस्मित मृत्यू म्हणून पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास सोसायटी मित्र मंडळ आयोजित झंकार नवरात्रोत्सवाला सोमवारी भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत यांनी भेट दिली. त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत उद्योजक राजू गुप्ते, जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, रतन दास, प्रशांत पॉल, सुदर्शन पॉल, बाळकृष्ण निरगुडे, श्याम कांडपीळे, श्याम मोरे, राजन नावंदर, शैलेश शहा, सुहास वनगे, खाडे साहे, म्हात्रे सर, उमेश नाईक, गिरीश जगे, दिलीप पाटील, डॉ. केदारनाथ थोरात, सुरेश राजपुरोहीत आदी.**

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सायबर सिक्युरिटीबाबत सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे मंगळवारी (दि.८) ओवेपेठ गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सिक्युरिटीवर जागरूकता सत्राचे आयोजन केले होते.



या उपक्रमाचा प्रमुख उद्देश जिल्हा परिषदेच्या शाळेमधील पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना सायबर सिक्युरिटीविषयी माहिती व्हावी हा होता. या उपक्रमासाठी महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञान विभागातील विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यांनी जिल्हा परिषदेच्या शाळेत जाऊन तेथील विद्यार्थ्यांना सायबर सिक्युरिटीबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी हा उपक्रम यशस्वीरित्या राबवल्याबद्दल माहिती व तंत्रज्ञान विभागातील सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. राजश्री म्हात्रे माहिती व तंत्रज्ञान विभाग प्रमुख यांनी केले तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागातील इतर सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांनी आकुर्ली परिसरात विकासकामांसाठी निधी मंजूर केला आहे. त्यांच्या या कार्याचे आभार मानण्यासाठी भाजप युवा मोर्चाच्या वतीने आकुर्ली परिसरात बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचे उद्घाटन भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, विश्वजीत पाटील, सुनील पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. बाईक रॅलीत युवकांचा सहभाग होता.**



**उलवे नोड : भाजपने हरियाणा विधानसभा निवडणुकीत विजय मिळवला असून तेथे तिसऱ्यांदा पक्षाचे सरकार स्थापन होणार आहे. या विजयाचा भाजप कार्यालयासमोर वहाळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच तथा उलवे नोड गव्हाण विभागीय अध्यक्ष अमर म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली जल्लोष करण्यात आला. या वेळी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## नवरात्रोत्सवात विविध कार्यक्रम



**पनवेल : वार्ताहर**

भाजप प्रदेश महासचिव विक्रांत पाटील यांनी आयोजित केलेल्या नवरात्र उत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या नव दिवस चालणाऱ्या नवरात्र उत्सवास चला हवा येऊद्या फेम श्रेया बुगडे यांनी हजर राहत नागरिकांची मने जिंकली. या वेळी विजेत्या स्पर्धकांना श्रेया यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले व सर्व महिलांसोबत गरबा दांडिया कार्यक्रमात देखील सहभागी झाल्या यासह पाककला स्पर्धा, टाकाऊ पासून टिकाऊ स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पणती रंगवणे स्पर्धा, ट्रेजरहंट, कोण होणार गरबा स्टार स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या वेळी विक्रांत पाटील यांनी सहभागी होत विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण केले.



## संपादकीय

# हरियाणात भाजपची हॅट्ट्रिक

हरियाणात भारतीय जनता पक्षाची सलग तिसऱ्यांदा सत्ता स्थापित होणार असल्यामुळे विजयाची ही हॅट्ट्रिक अवघ्या देशभरातील भाजप कार्यकर्त्यांना आणि समर्थकांना आनंदित करून गेली आहे. विशेषत: महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका तोंडावर असताना हरियाणातील या ऐतिहासिक विजयाची बातमी आल्याने येथील दोन्ही बाजूच्या जागावाटपाच्या समीकरणांवर नक्कीच परिणाम होईल असे म्हटले जाते आहे.

**लोकसभा निवडणुकांच्या निकालापासून देशात काँग्रेस पुन्हा उभारी घेत असल्याची पोकळ चर्चा सुरू करण्यात आली होती, पण विरोधकांच्या या कथित आत्मविश्वासाचा फुगा हरियाणातील भाजपच्या दणदणीत विजयामुळे नक्कीच फुटला असेल. हरियाणात यापूर्वी कुठल्याही पक्षाला तिसऱ्यांदा सत्ता मिळवता आलेली नाही. या राज्यात सत्ताधारी भाजपविरोधात नाराजीची लाट आहे असे म्हटले जात होते, परंतु मंगळवारी प्रत्यक्ष निकालात मात्र भाजपच्या बाजूने पुन्हा स्पष्ट कौल मिळाला असून ४९ जागा जिंकून भाजपने हरियाणात सत्तास्थापनेची हॅट्ट्रिक पूर्ण केली आहे. जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेसला आघाडी मिळाली असली तरी मंगळवारी अवघ्या देशात चर्चा होती ती भाजपच्या हरियाणातील ऐतिहासिक विजयाचीच. हरियाणा विधानसभेच्या ९० जागांसाठी ५ ऑक्टोबर रोजी मतदान झाले होते, तर जम्मू-काश्मीर विधानसभेच्या ९० जागांसाठी १८ सप्टेंबर, २५ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर रोजी तीन टप्प्यात मतदान झाले. मतदान झाल्यानंतर जाहीर करण्यात आलेल्या एक्झिट पोलमध्ये बहुतांश संस्था किंवा वाहिन्यांनी हरियाणात काँग्रेसला अधिक जागा मिळतील असा अंदाज व्यक्त केला होता, परंतु हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी मात्र विजयाची खात्री व्यक्त करत होते. जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० हटवल्यानंतर प्रथमच विधानसभा निवडणुका पार पडत असल्यामुळे देशाचे लक्ष याही निवडणुकांच्या निकालांकडे होते, पण मंगळवारी जाहीर झालेल्या निकालांत हरियाणात काँग्रेसला मोठा फटका बसल्याचे दुपारपासून दिसू लागले आणि सगळ्यांचेच अवघे लक्ष हरियाणाकडे केंद्रित झाले. निकालांनी सुन्न झालेल्या काँग्रेस पक्षाने नेहमीप्रमाणे निवडणूक आयोगाच्या विरोधात ओरड सुरू केली. आयोगाकडून त्यांच्या संकेतस्थळावर मतांची आकडेवारी वेगाने अपडेट केली जात नसल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला व अंतिम आकडेवारीत पक्षाच्या जागा वाढतील असेही सुचवण्यात आले. परंतु तसे काही घडताना दिवसाअखेरीस दिसले नाहीच. अर्थातच त्या पक्षाला अपयशाच्या धक्क्यातून सावरायला वेळ लागणार आहे. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने राज्यात दहा वर्षे सत्तेत असल्याने नाराजीचा फॅक्टर ध्यानात घेऊन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावरच मनोहरलाल खट्टर यांना मुख्यमंत्रीपदावरून हटवून नायबसिंह सैनी या ओबीसी समाजाच्या नेत्याची मुख्यमंत्रीपदी निवड केली. सैनी यांनी अवघ्या सहा महिन्यांच्या कार्यकाळात नागरिकांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले. त्याचा फायदा होऊन भाजपला हा ऐतिहासिक विजय मिळाल्याचे आता म्हटले जाते आहे. यापूर्वी या राज्यात कुठल्याही पक्षाला सलग तीन निवडणुकांमध्ये विजय मिळालेला नाही. हरियाणातील भाजपच्या या दमदार यशाचा झारखंड आणि महाराष्ट्र या राज्यांतील आगामी विधानसभा निवडणुकांवर नक्कीच परिणाम होईल असे दिसते आहे. पक्षाच्या कार्यकर्त्यांचा उत्साह यामुळे उंचावेल हे निश्चित. या निकालांनंतर एक्झिट पोल्सनी एक्झिट घेण्याची वेळ मात्र नक्कीच झाली आहे. कारण काँग्रेसची त्सुनामी येईल असे या पोलमध्ये म्हणणाऱ्यांना चांगलाच झटका बसला आहे. हरियाणात त्सुनामी आली, पण ती डबल इंजिन सरकारच्या बाजूने आली असे आता म्हणावे लागेल.**

# मोबाईलचे वाढते व्यसन ठरतेय धोकादायक!



**खबरबात**
**नितीन देशमुख**

कल्याण रेल्वे स्टेशनजवळ एक तरुणी कानात इअर फोन अडकवून मोबाईलवर गाणी ऐकत रेल्वे लाईनवरून चालत जात होती. आपल्या मागून ट्रेन येत असल्याकडे तिचे लक्षच नव्हते. मोटारमनने जोरात हॉर्न वाजल्यावर तिने घाईघाईने बाजूला जाण्याचा प्रयत्न केला, पण नशिबाने साथ दिली नाही. भावी आयुष्याची स्वप्ने रंगवणाऱ्या तिचे स्वप्न अधुरे राहिले. बातमी ऐकून अनेकांना वाईट वाटले.

आज शाळा आणि महाविद्यालयात मुलांना त्यांच्या अभ्यासाविषयी सगळी माहिती मोबाईलवर दिली जाते. त्यामुळे मुले कायम मोबाईलमध्येच असतात. पालकांनी विचारल्यावर अभ्यास करतोय सांगतात. प्रत्यक्ष काय करतात हे पालक कधी बघतच नाहीत. आजची तरुण पिढी मोबाईलच्या आहारी गेली आहे. एक वेळ त्यांना जेवण नसले तरी चालेल, पण मोबाईलशिवाय ते राहू शकत नाहीत. प्रवासात किंवा रस्त्याने चालताना त्यांच्या कानाला मोबाईल असतोच. कानात इअर फोन अडकवून बसल्याने त्यांना घरात कोण काय बोलत आहे याचा पत्ताच नसतो. रस्त्याने चालताना आजूबाजूचा आवाज येत नाही आणि मग पालकांवर हळहळण्याची वेळ येते.

मी दोन दिवसांपूर्वी एका मित्राकडे गेलो होतो. तो घरी नव्हता. त्याचा नेहमी गडबड करणारा लहान मुलगा घाबरून कोपऱ्यात मान खाली घालून बसला होता. मला समजेना याला काय झाले. म्हणून मी त्याला विचारले अरे, आज काय झाले आहे. तेवढ्यात त्याची आई म्हणाली, अहो रात्री मोबाईल खेळायला घेऊन त्याने मोठा उद्योग करून ठेवला. त्यामुळे आमचे धंद्यात मोठे नुकसान झाले. त्याचे बाबा खूप चिडलेत. सकाळी हा शाळेत गेला होता म्हणून वाचला नाही तर त्याने मार खाल्ला असता. शाळेतून घरी आल्यावर मी त्याला विचारल्यावर आता बाबा ओरडणार म्हणून तो घाबरून बसला आहे.

मला समजेना १०-१२ वर्षाच्या मुलाच्या हातून काय मोठी चूक झाली असावी, ज्यामुळे मित्राला धंद्यात मोठे नुकसान सोसावे लागले. मी अखेर न राहून विचारले वाहिनी एवढे काय केले त्याने की, धंद्यात मोठे नुकसान सोसावे लागले. अहो, या मुलांना मोबाईल घेऊन खेळाची सवय लागली आहे. त्याचा बाबा घरात आला की, हा मोबाईल घेऊन खेळत बसतो. गेम खेळताना आवाज येऊ नये म्हणून मोबाईलचा आवाज बंद करून ठेवतो. कालही रात्री हा मोबाईल घेऊन खेळत होता. त्याने आवाज बंद करून ठेवला होता. खेळता खेळता झोपला आणि मोबाईलचा आवाज बंदच राहिला. सकाळपासून अनेक ग्राहकांचे फोन येत होते, पण रिंग बंद असल्याने त्यांना समजलेच नाही. एका मोठ्या ग्राहकाने अनेक वेळा फोन करून उत्तर न मिळाल्याने आमची ऑर्डर दुसऱ्याला दिली. त्यामुळे मोठे नुकसान झाले.

मोबाईल हातात आल्यावर लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच त्याचे वेड लागले आहे. आज घरातील संवाद बंद झाले आहेत. घरातही एकमेकांशी बोलताना अनेक जण मोबाईलवर मेसेज पाठवून बोलताना दिसतात. पती- पत्नी दिवसा काम करीत असताना एकमेकांना मेसेज पाठवतात. प्रत्यक्ष संवाद फार कमी झाला आहे. कामावरून घरी आल्यावर चहा घेत किंवा रात्री जेवताना एकमेकांशी संवाद करताना कोणी दिसत नाही. या सवयीमुळे अनेकजण व्याधीग्रस्त झाले आहेत. पत्नी कायम मोबाईलवर असते, म्हणून एकाने कोर्टात घटस्फोट मागितल्याचेही उदाहरण आहे.

प्रत्येकजण मोबाईलवर चॅटिंग करताना किंवा गेम खेळताना दिसतात. त्यामुळे मुलांनाही मोबाईलवर खेळण्याचे आकर्षण वाटले तर नवल नाही. लहानपणी मुलगा रडू लागला की त्याला मोबाईल हातात देऊन गप्प बसवण्याची सवय लावलेली असते. पालकांना बऱ्याचदा सोयीस्कर वाटत असले तरी सतत मोबाईल पाहणे मुलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. थोडेसे कळायला लागल्यावर मुले मोठ्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे ती मोबाईलमधले खेळ खेळायला लागतात. गेम खेळताना आवाज आल्यास पालक ओरडतील या भीतीने मुले त्याचा आवाज बंद करून ठेवतात. त्यामुळे महत्त्वाचे फोन आल्याचे समजत नाही.

मोबाईल हे माध्यम कधी किती घातक ठरू शकते हे कळत नाही, पण मोबाईलमुळे मुलांवर अनेक दुष्परिणाम होत आहेत. मोबाईलमुळे मुलांची शिक्षणात गळती होत आहे, मुलांमध्ये आक्रमकता वाढत आहे, आणि मुलांमध्ये मानसिक आजार होण्याचा धोका वाढत आहे.

मोबाईलमुळे होणाऱ्या या दुष्परिणामांपासून मुलांना वाचवण्यासाठी पालकांनी काही खबरदारी घ्यायला हवी. पालकांनी मुलांना मोबाईलचा वापर मर्यादित ठेवावा. मुलांना मोबाईलमध्ये कोणते व्हिडीओ पाहायचे आहेत यावर लक्ष ठेवावे आणि मुलांमध्ये मोबाईलच्या व्यसनाची लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा. पालकांनी मुलांना मोबाईलच्या व्यसनपासून वाचवण्यासाठी अधिक खबरदारी घ्यावी लागेल. तरच त्यांचे आयुष्य बरबाद होण्यापासून वाचेल. सर्वांनीच याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आता आली आहे.

# जागतिक टपाल दिन

दरवर्षी ९ ऑक्टोबर या दिवशी जागतिक टपाल सेवा दिवस (जागतिक टपाल दिवस किंवा जागतिक डाक दिवस) साजरा केला जातो. टेलिफोन आणि मोबाईल अस्तित्वात येण्याच्या आधीपासून टपाल सेवा अस्तित्वात आहे. टपाल सेवेला मोठा इतिहास आहे.

राजे, राजघराणी, राजांचे अधिकारी आणि कर्मचारी तसेच सामान्य नागरिक पत्रांद्वारे एकमेकांच्या संपर्कात असायचे. आधी प्रत्येक गावात एक शिपाई असायचा. हा शिपाई गावातील पत्र घेऊन पुढच्या गावातल्या शिपायाला द्यायचा. प्रत्येक शिपाई त्याच्याकडे आलेल्या पत्रातील जी पुढे पाठवायची ती वेगळ्या पिशवीत भरून पुढच्या गावाला द्यायचा आणि जी स्वतःच्या गावातील आहेत ती पत्र स्वतःकडे ठेवून नंतर संबंधित ठिकाणी जाऊन वाटप करायचा. पुढे या व्यवस्थेत पिनकोड क्रमांकांचा समावेश झाला. यामुळे पत्त्यांची अचूकता वाढली आणि टपालसेवा अधिक प्रभावी झाली.

ब्रिटिश काळापासून चालत आलेले टपाल खाते आज एका वेगळ्याच उंचीवर पोहचलेले आहे. आजच्या एसएमएस, व्हॉट्सॲप, ई-मेलच्या जमान्यातही टपाल यंत्रणा अन् पोस्टमनकाका आजही लोकांच्या मनात पाय रोवून उभे आहेत. ऊन पावसाची तमा न बाळगता पत्र असो वा स्पीड पोस्ट वा रजिस्टर पार्सल असो प्रत्येकाच्या घरात प्रामाणिकपणे पोहोचवणारा हक्काचा जिव्हाळ्याचा माणूस म्हणजे पोस्टमन असतो.

देशात १ एप्रिल १८५४ रोजी टपालसेवेला सुरुवात झाली. तेव्हापासून देशाच्या कानाकोपऱ्यात संदेशाचे वहन करण्यात टपाल खात्याची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. स्मार्ट मोबाईल, इंटरनेट अशा वेगवान संदेशवहनाच्या काळात टपाल खात्याने महत्त्व टिकवून ठेवले आहे.

स्वित्झर्लंडमध्ये ९ ऑक्टोबर १८७४ रोजी २२ देशांनी एका करारावर स्वाक्षरी (सही) केली आणि युनिव्हर्सल पोस्टल युनियन स्थापन झाली. ही अधिकृत आंतरराष्ट्रीय टपाल सेवेची सुरुवात होती. करारात सहभागी झालेल्या देशांनी आंतरराष्ट्रीय पत्रव्यवहारासाठी विशिष्ट नियमांची चौकट निश्चित केली. यानंतर १९६९मध्ये जपानची राजधानी टोकियो येथे युनिव्हर्सल पोस्टल युनियनची परिषद झाली. याच परिषदेत दरवर्षी ९ ऑक्टोबर हा दिवस जागतिक टपाल दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय झाला.

**(साभार : अभिजित भारत)**




# तीन सेटिंगशिवाय इन्स्टावर फोटो, व्हिडीओ शेअर करू नका

अनेक जण दरदिवशी सोशल मीडियावर त्याच्या अकाउंटवरून फोटो किंवा व्हिडीओ शेअर करत असतात पण अनेकदा त्या फोटोंवर किंवा व्हिडीओवर मनाप्रमाणे लाइक्स, व्ह्यूज येत नाही. सध्या असाच एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. इन्स्टाग्रामवर फोटो किंवा व्हिडीओ शेअर करण्यापूर्वी तीन सेटिंग्ज करण्यास या व्हिडीओमध्ये सांगितले आहेत. त्या सेटिंग्ज कोणत्या आहेत हे आज आपण जाणून घेणार आहोत. या तीन सेटिंग्ज केल्याशिवाय इन्स्टाग्रामवर फोटो किंवा व्हिडीओ पोस्ट करू नये.



१. सेटिंग्ज आणि अक्टिव्हिटीमध्ये जा. त्यानंतर क्रॉसपोस्टिंगवर क्लिक करा. त्यानंतर 'Recommend reels on Facebook' ऑन करा. त्यानंतर इन्स्टाग्रामवरील पोस्ट, स्टोरी आणि रील्स फेसबुकवर शेअर करण्याचे ऑप्शन ऑन करा.

२. मीडिया क्वालीटी या ऑप्शनवर क्लिक करा. त्यानंतर तुम्हाला तीन ऑप्शन दिसेल.त्यापैकी पहिले use less mobile data आणि तिसरे Disable HDR Video playback पर्याय ऑफ करा.

३. एडिट प्रोफाइलमध्ये जा आणि 'Show account suggestions on profile' हे सजेशन अकाउंट ऑप्शन ऑन करा.


officialpwnkumar या इन्स्टाग्राम अकाउंटवरुन हा व्हिडीओ शेअर करण्यात आला असून या व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये लिहिलेय, या तीन सेटिंग्जशिवाय इन्स्टाग्रामवर फोटो किंवा व्हिडीओ कधीही शेअर करू नका.

या व्हिडीओवर अनेक युजर्सनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका युजरने लिहिलेय, खूप छान माहिती दिली, तर एका युजरने लिहिलेय, हे सेटिंग्ज केल्यानंतर मला मोठा बदल जाणवला. खूप खूप आभार आणखी एका युजरने लिहिलेय, धन्यवाद इतकी महत्त्वाची माहिती शेअर केल्याबद्दल. अनेक युजर्सनी चांगली माहिती शेअर केल्याबद्दल आभार व्यक्त केले आहे.

पवन कुमार हा त्याच्या officialpwnkumar या इन्स्टाग्राम अकाउंटवरून नवनवीन माहिती, ट्रिक सांगतो. सोशल मीडियावर हजारो लोक त्याला फॉलो करतात. त्याच्या प्रत्येक पोस्टवर लाईक, कमेंट्चा वर्षाव करतात.

# संगीत रचनाकार, गायकनट गोविंदराव टेंबे

प्रख्यात हार्मोनियमवादक, संगीतरचनाकार, गायकनट व साहित्यिक गोविंदराव सदाशिवराव टेंबे यांचा आज स्मृतीदिन. त्यांचा जन्म ५ जून १८८१ रोजी सांगवडे (जि. कोल्हापूर) येथे झाला. त्यांच्या आईचे नाव अंबा. गोविंदरावांनी कोल्हापूर येथेच शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेतले व काही वर्षे सनदी वकिली केली. गायनाच्या कार्यक्रमात जाऊन त्यांना संवादिनी (हार्मोनियम) या वाद्याची आवड निर्माण झाली. प्रत्यक्ष या वाद्यवादनाचे रीतसर शिक्षण त्यांनी घेतले नव्हते, परंतु स्वप्रयत्नाने त्यांनी या वादनात प्रावीण्य मिळवले. गोविंदराव भास्करबुवा बखले यांच्या साथीला असायचे आणि बहुतेक वेळा संवादिनीचा एकपात्री प्रयोगही करायचे. ते बर्कतुल्ला सितारिये यांचे गंडाबंद शागीर्द होते.



१९११-१३ या काळात त्यांनी 'किर्लोस्कर नाटक मंडळी'त प्रमुख गायकनट म्हणून काम केले. पुढे १९१३-१५ या दरम्यान 'गंधर्व नाटक मंडळी'त सुरुवातीचे भागीदार व नट म्हणून त्यांनी काम केले. १९१७मध्ये त्यांनी स्वत:च्या 'शिवराज नाटक मंडळी' या संगीत नाटक मंडळीची स्थापना केली. यासाठी त्यांनी नवी नाटके लिहिली, पदे रचली आणि संगीतही दिले. 'धैर्यधर' (मानापमान), 'कच' (विद्याहरण), 'चारूदत्त' (मृच्छकटिक) या त्यांच्या काही प्रमुख गाजलेल्या भूमिका. त्यांनी मानपमान या नाटकास संगीतही दिले.

**निमित्त**

१९३०च्या सुमारास त्यांनी चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण केले आणि प्रभात, इंपीरियल, ईस्ट इंडिया, मिनर्व्हा, नटराज इ. संस्थांच्या चित्रपटांमध्ये प्रमुख भूमिका केल्या तसेच संवादलेखन, गीतरचना व संगीतदिग्दर्शन या क्षेत्रांतही प्रशंसनीय कामगिरी केली. अयोध्येचा राजा या पहिल्या मराठी बोलपटात ते नायकाच्या प्रमुख भूमिकेत होते. या चित्रपटाचे संगीतदिग्दर्शनही त्यांनी केले होते. यांखेरीज त्यांनी अनेक नाटके लिहिली तसेच महाश्वेता, जयदेव, प्रतिमा इ. संगीतिका (ऑपेरा) लिहून त्या सादरही केल्या. १९३९मध्ये त्यांनी म्हैसूर संस्थानच्या युवराजांबरोबर यूरोपचा दौरा केला. तेथे त्यांना पोपच्या समोर कार्यक्रम करण्याची संधी मिळाली.

संवादिनी या साथीच्या वाद्याला टेंबे यांनी स्वतंत्र वाद्याची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पेटीवर बोटे टाकण्याची त्यांची पद्धत अंत:करणाचा ठाव घेणारी होती. जयपूर घराण्याची तेढी, बिकट गायकी व अभिजात नाट्यसंगीत या दोहोंचे वादन ते सारख्याच कुशलतेने पेटीवर करीत. त्यांनी मराठी संगीताचा मानबिंदू अशा लक्षणगीतांची रचना केली. या लक्षणगीतांची ध्वनिमुद्रिकाही नंतर प्रकाशित करण्यात आली.

माझा संगीत-व्यासंग (१९३९), माझा जीवन विहार (आत्मचरित्र, १९४८), खाँसाहेब अल्लादियाखाँ यांचे चरित्र (१९५४), जीवनव्यासंग (१९५६) ही त्यांची महत्त्वाची ग्रंथनिर्मिती. टेंबे यांच्या ग्रंथांतून नाट्य व संगीताची दुनिया अतिशय हृद्यतेने रूपास आली आहे. भारत नाट्यसंमेलन (१९३३), मराठी रंगभूमी शतसांवत्सरिक उत्सव, नागपूर (१९४३), मराठी साहित्य परिषद, बडोदे आदींची अध्यक्षपदेही त्यांनी भूषविली. कोल्हापूरातील गायन समाज देवल क्लब या संस्थेशी त्यांचा निकटचा संबंध होता. ते या संस्थेचे काही काळ संचालकही होते. या संस्थेमध्ये त्यांच्या स्मरणार्थ गोविंदराव टेंबे रंगमंदिर उभारण्यात आलेले आहे. गोविंदरावांचा विवाह लक्ष्मी यांच्याशी झाला. त्यांना रघुनाथ, गणेश व माधव हे तीन पुत्र. माधव टेंबे हेदेखील संवादिनी वाजवत असत. गोविंदरावांचे ९ ऑक्टोबर १९५५ रोजी दिल्ली येथे निधन झाले. **-सुधीर पोटे**

**क्लिक...क्लिक...!**



**श्रीवर्धन : निळ्याशार आकाशात सुर्यास्ताच्या वेळेस होणारी किरणांची उधळण मनाला मोहिनी घालते. अशा निसर्गसंपन्न वातावरणात दिवेआगर समुद्र किनाऱ्यावर घोडागाडीतून रपेट मारताना पर्यटक.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

# पोट बिघडल्यानंतर काय खावे व काय खाऊ नये?

ठराविक अन्नपदार्थांमुळे तसेच खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयींमुळे सहसा पोट बिघडते. पोट बिघडल्यानंतर पोटाच्या विविध समस्या व पोटदुखीचा त्रास सहन करावा लागतोच, पण त्याचबरोबर आपण आवडते पदार्थ खाऊ शकत नाही आणि काही कालावधीसाठी चविष्ट नसलेले कंटाळवाणे अन्नपदार्थ खावे लागते. ज्यांचे सतत पोट बिघडते त्यांनी जेवण करावे की नाही, हा एक जुना प्रश्न आहे.



खरंच पोट बिघडल्यानंतर जेवण करणे टाळणे फायदेशीर असते का? पोट बिघडल्यानंतर काय खावे आणि काय खाऊ नये याविषयी सर एचएन रिलायन्स फाऊंडेशन हॉस्पिटलच्या क्लिनिकल आहारतज्ज्ञ वेदिका प्रेमानी सांगतात, पोट बिघडल्यानंतर जेवण न केल्याने पोटात अन्नापेक्षा जास्त सिड तयार होऊ शकते, ज्यामुळे पोट फुगणे, सिडिटी, पोटात अस्वस्थता जाणवणे इत्यादी लक्षणे दिसू शकतात.

आहारतज्ज्ञ प्रेरणा सोलंकी याविषयी सांगतात, पोट बिघडल्यानंतर उपवास करावा की नाही किंवा जेवण करावे की नाही, हे पोट बिघडण्याचे कारण आणि त्याच्या तीव्रतेवर अवलंबून असते. त्या पुढे सांगतात, जर लक्षणे सौम्य असतील तर तुम्ही थोड्या प्रमाणात एका ठराविक वेळेनंतर जेवण करू शकता. सहज पचणारे अन्नपदार्थ आणि मसालेदार व फॅट नसलेले पदार्थ खाऊ शकता, पण जर लक्षणे गंभीर असतील तर पोटाला आराम द्या आणि जास्तीत जास्त पाणी पिण्याकडे लक्ष केंद्रित करा तसेच काही तास उपवास करा.

सोलंकी सांगतात की, जेव्हा तुमचे पोट बिघडते तेव्हा उपवास केल्यामुळे किंवा जेवण न केल्यामुळे तुमच्या पचनसंस्थेला आराम मिळतो, पण हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की, आपले यकृत आणि किडनी हे नैसर्गिकरित्या शरीरातून विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतात; त्यासाठी उपवास करण्याची गरज नाही, पण काहीवेळा जेवण कमी केल्याने पोटाच्या समस्या दूर होऊ शकतात. पोट बिघडल्यानंतर तुम्ही उपवास केला तरी हायड्रेटेड राहणे खूप महत्त्वाचे आहे. पाणी, हर्बल चहा किंवा सूपसारखे द्रव्य पदार्थ प्यायल्याने शरीरात पाण्याची कमतरता भासत नाही. विशेषत: जेव्हा तुम्हाला उलट्या किंवा अतिसाराचा त्रास होत असेल तर शरीर हायड्रेटेड ठेवा.

दुग्धजन्य पदार्थ, सूप, फळांचा रस, भात यांसारख्या पदार्थांमुळे अतिसार, मळमळ दूर होते, याशिवाय उलट्यांचा त्रास कमी होतो, असे डॉ. प्रार्थना शाह सांगतात.

# विकासकामांना निधी कमी पडू देणार नाही -वैकुंठ पाटील



**पाली : प्रतिनिधी**

विकासकामांना निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष युवा नेते वैकुंठ पाटील यांनी दिली. पेण येथील विकासकामांच्या भूमिपूजनावेळी ते बोलत होते.

पेण तालुक्यासह रायगड जिल्ह्यात भाजपने विकास कामांचा धुमधडाका सुरू केला आहे. गावोगावी आदिवासी वाड्या पाड्यांना जोडणारे प्रमुख रस्ते, दळणवळणाच्या सेवा सुविधा निर्माणावर विशेष भर दिला जात आहे. अर्थसंकल्पीय ५०५४/०४ सार्वजनिक बांधकाम विभाग बजेट अंतर्गत शिहू ग्रामपंचायत हद्दीत जुनी वसाहत जांभूळटेप रस्त्या करिता २५ लाख आणि नवीन वसाहत जांभूळ टेप रस्ता करीता २५ लाख असा एकूण ५० लाख रुपयांचा भरीव निधी उपलब्द करून देण्यात आला आहे.

सदरचा निधी उपलब्द होणेकामी माजी कॅबिनेट मंत्री तथा विद्यमान पेण सुधागड रोहा मतदार संघाचे आमदार रविशेठ पाटील व खासदार धैर्यशील पाटील यांचे महत्त्वपूर्ण पाठपुरावा व योगदान राहिले आहे. या कामाचा जोरदार शुभारंभ भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष युवा नेते वैकुंठ पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा ॲड. नीलिमा पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला.

खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र पाटील यांच्या माध्यमातून रस्त्याचे काम झाले आहे, या भागातील विकास कामांना मोठ्या प्रमाणावर चालना देण्यात आली आहे. या भागात भाजपच्या माध्यमातून रस्ते, स्मशानभूमी, सेड ची कामे मोठ्या प्रमाणावर होत आहेत. अनेक वर्षांपासून रखडलेल्या बोरावाडीच्या रस्त्यासाठी तब्बल सहा कोटीच्या निधीला मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे जनतेला दिलासा मिळाला आहे. येत्या काळातदेखील विकास कामांना निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही वैंकुंठ शेठ पाटील यांनी या वेळी दिली.

दरम्यान, मागील अनेक वर्षांपासून येथील स्थानिक रहिवाशी नागरिक यांना वाहतूक व प्रवास करताना प्रचंड त्रास सहन करावा लागत असे. येथील खडतर आणि कष्टप्रद असा रस्ता आता सुसज्य होत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

या वेळी भाजप उपाध्यक्षा, युवा नेते वैकुंठ शेठ पाटील, माजी रायगड जिल्हा परिषद अध्यक्षा ॲड. निलिमा पाटील, बाजार समिती उप सभापती नितीन पाटील, पेण तालुका उपाध्यक्ष वसंत मोकल, हिरामण कोकाटे, भगवान म्हात्रे, संजय कुथे, चंद्रकांत पाटील, रमेश म्हात्रे सर, संतोष वाघ, माणिक गावंड, किरण तुरे, नवज्योत तांडेल, हरींचंद्र जांभळे, सुधाकर तुरे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तळाघर विभागात वायू प्रदूषण; नागरिक हैराण



**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव एमआयडीसीतील अनेक कंपन्यांत अपघाताच्या घटना घडत असतानाच विषारी जल, वायू प्रदूषणानेही उच्चांक गाठला. याबाबत स्थानिक मुख्यत: एमपीसीबी प्रशासन अधिकाऱ्यांनाच गांभीर्य नाही. यामुळे कंपन्या परिसर तळाघर, बोरघर, निवी, लांढर गावांना वायू प्रदूषणाचा मोठा फटका बसत आहे.

दररोज वायू प्रदूषणाची मात्रा वाढत धुपारत सुरूच असल्याने परिसरातील नागरिक अक्षरशः हैराण झालेत. डोकेदुखी, डोळ्यांची जळजळ, फुफ्फुसाचे आजार , उलटी, जुलाब व्याधींनी डोके वर काढले. दवाखाने फुल्ल भरलेत. आधीच दररोजच्या विषारी वायू प्रदूषणाने भातशेती, कडधान्य यांसह सर्वच पिके कायम धोक्यात आलीत. शेतकऱ्यांना भरपाई देण्यासाठी आजवर कोणीच प्रयत्न केले नाही. याच वास्तवात वाढत्या विषारी वायू प्रदूषणाच्या मात्राने सामाजिक स्वास्थ कायम धोक्यात आले आहे.

अपघाती, प्रदूषणाच्या घटना सुरू असतानाच , सॉल्वे, अंथेआ कंपनीच्या मागील तळाघर, निवी, वरसे परिसरात दररोज सकाळी विषारी वायू प्रदूषणाची मात्रा सुरूच आहे. तब्बल आठवडाभर वायू प्रदूषणाच्या धुपारतीत भरतीच वाढ झाली. प्रदूषणाने डोळ्यांची जळजळ, खोकला, डोकेदुखी, मळमळणे, उलटी यांसारख्या व्याधी सुरू झाल्यात. हवेतील प्रदूषणाने सामाजिक स्वास्थ बिघडले. शहरातील दवाखाने फुल्ल भरलेत. विषारी वायू प्रदूषण रोखण्यात संबंधीत प्रशासन नेहमीच अपयशी ठरत असल्याने विभागीय नागरिकांनी संताप व्यक्त केला. आधीच सततच्या वायू प्रदूषणाने आमची भातशेती, कडधान्य व अन्य शेती नापीक केलीत. नुकसान भरपाई कधीच दिली नाहीत यावर बळीराजा फाऊंडेशन आक्रमक पवित्र्यात आहे. आता विषारी वायू प्रदूषणाने सामाजिक आरोग्यच बिघडवत आहात.

# खोपोली बायपासजवळ तीन अपघात; दोघे जखमी, सात वाहनांचे नुकसान



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेळेवर सकाळीच्या सुमारास एकूण तीन अपघात झाले. यात सहा ते सात वाहने बाधित झाली. दोन ट्रकमध्ये चालक अडकल्याने त्यांना सुखरूप बाहेर काढून रुग्णालयात पाठविण्यात आले. या घटनेने एक्सप्रेस वेळेवर वाहतूक कोंडी झाली, मात्र बाधित वाहने बाजूला केल्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात बचाव पथकाला यश आले. अपघातांमध्ये दोन जण जखमी आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर मुंबई लेनवर किमी ३८.५०० येथे ट्रकवरील चालकाने ट्रक अतिवेगाने चालवल्याने त्याचे ट्रक वरील नियंत्रण सुटून त्याने समोरील कंटेनरला पाठीमागून ठोकर मारून अपघात केला. या अपघातामध्ये ट्रकचालक यास गंभीर दुखापत होऊन तो केबिनमध्ये अडकलेला असताना त्याला देवदूत टीमच्या मदतीने बाहेर काढून उपचाराकरता एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे पाठवण्यात आले.

यानंतर मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर मुंबई लेनवर किमी ३९.५०० येथे कंटेनरवरील चालकाचे कंटेनर वरील नियंत्रण सुटून त्याने समोरील वाहनाला पाठीमागून ठोकर मारून अपघात केला असून अपघातामध्ये कंटेनर चालक किरकोळ जखमी झाला आहे. या दोन्ही अपघातातील वाहने बाजूला घेऊन वाहतूक सुरळीत करत असताना ०९:३० वाजताचे सुमारासच मुंबई लेनवर किमी ३९.७०० येथे कंटेनरचा ब्रेक फेल झाल्याने त्याचे कंटेनर वरील नियंत्रण सुटून त्याने समोरील कारला ठोकर मारल्याने या कारची त्यापुढील पिकअपला ठोकर लागून अपघात झाला. सुदैवाने या अपघातात कोणीही जखमी झाले नाही, मात्र वाहनांचे नुकसान झाले आहे.

सकाळच्या सुमारास एका मागोमाग एक झालेल्या अपघातांमध्ये आय आर बी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, महामार्ग वाहतूक पोलीस यंत्रणा बोरघाट, लोकमान्य हॉस्पिटलची म्बुलन्स सेवा, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल आणि अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेकडून या अपघातात मदत झाली आहे. तातडीने मदत कार्य करून वाहने बाजूला घेऊन ताबडतोब वाहतूक सुरळीत करण्यात यश आले. खोपोली स्टेशनच्या हद्दीत हा अपघात घडलेला आहे. खोपोली पोलीस स्टेशनच्या टीमने घटनास्थळी दाखल होऊन अपघातांची नोंद केली आहे.

# उद्योजक विजय मेथा यांचा सत्कार



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव संगमेश्वर नगर भागातील श्री स्वयंभू संगमेश्वर मंदिर देवस्थान ट्रस्टतर्फे नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून माणगाव तालुक्यातील उद्योजक विजय मेथा यांचा रविवारी सत्कार करण्यात आला.

जुने माणगाव संगमेश्वर नगर भागातील श्री स्वयंभू संगमेश्वर मंदिर देवस्थान ट्रस्टतर्फे यावर्षी प्रथमच देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संजय आण्णा साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली व वॉर्डाचे नगरसेवक दिनेश रातवडकर तसेच संगमेश्वर नगरातील रहिवाशी यांच्या सहकार्याने मंदिराच्या जागेत नवरात्र उत्सवाचे दिमाखदार पद्धतीने आयोजन करण्यात आले आहे.

या नवरात्र उत्सवात रविवारी रात्री माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते विजय मेथा यांचा श्री स्वयंभू संगमेश्वर मंदिर देवस्थान ट्रस्टतर्फे अध्यक्ष संजय आण्णा साबळे, नगरसेवक दिनेश रातवडकर,सचिन गोरेगावकर, प्रसिद्ध व्यापारी तथा कवी निलेश शेठ, रमेश पारखे यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.


**THE ROHA ASHTAMI CO. OP.URBAN BANK LTD.ROHA (DEREGISTERED)**
Kakasaheb Gangal Marg. At.post-Tal-roha, Dist-Raigad, Pin Code 402109

**E-Tender Notice**

The Roha Ashtami Co. op. Urban Bank Ltd. Roha (deregistered) Invites e-tenders between 04/10/2024 to 24/10/2024 for Sell of land and Buliding Standing on C.T.S.No. 576/A, 576/B, Area- 354.5 Sq.mtrs. At post, Tal- Roha, Dist-Raigad on as is where is & what is basis.

Note- All details in connection with the tender document, price, EMD. Terms & conditions etc. are available on WWW.MAHATENDERS.GOV.IN.

**sd/-**
**Signature**
**Custodian**
**THE ROHA ASHTAMI CO. OP.URBAN BANK LTD.ROHA (DEREGISTERED)**



**ग्रामपंचायत हाळखुर्द**
**ता. खालापूर, जि. रायगड**
**जाहिर निविदा**

ग्रामपंचायत हाकरखुर्द हद्दीतील मौजे हालखुई येथिल मा. गटविकास अधिकारी साहेब यांनी मंजुर केलेल्या अंदाजपत्रकानुसार मासिक सभा दि. २४/०९/२०२४ रोजी घेण्यात आली. ठराव क. १३/४१ अन्वये त्या अंदाजपत्रकानुसार ग्रामपंचायत फंड व १५ वा वित्त आयोग फंड अंतर्गत आवश्यक असणा-या कामांची निविदा मागविण्यात येत असून इच्छुक पुरवठादारांकडुन सिलबंद निविदा दिनांक ०९/१०/२०२४ ते १३/१०/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत हाळखुर्द कार्यालयात समक्ष अथवा पोष्टाने पाठवाव्यात. निविदा दि.१४/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सरपंच ग्रामपंचायत हाळखुर्द यांनी राखून ठेवला आहे. ती कामे पुढीलप्रमाणे.

| | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | वर्षे | इसारा रक्कम | योजनेचे नाव | कामपुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. अजिम मांडलेकर यांच्या घरापासून ते श्री. मुस्तुफा अब्दुल रेहमान दुस्ते यांचे घरापर्यंत गटर बांधणे, | ६९२२५० | २०२३-२४ | १ टक्के | १५ वा वित्त आयोग ( बंधित) | २ महिने |
| २ | ग्रामपंचायत हाळखुर्द हद्दीमध्ये डस्टबीन खरेदी करणे. | ५१९०६० | २०२४-२५ | १ टक्के | १५ वा वित्त आयोग (बंधित) | २ महिने |
| ३ | मौजे हाळखुर्द अंतर्गत खड्डे बुजविणे. | २६४६०० | २०२४-२५ | १ टक्के | ग्रामनिधी | २ महिने |
| ४ | मधला हाळाखुर्द मधला हाळ व खैरा वसाहत येथे अंतर्गत रस्ता खडीकरण करणे. व दुरुस्त करणे | ९३४०० | २०२४-२५ | १ टक्के | ग्रामनिधी | २ महिने |
| ५ | मधला हाळ येथिल श्री. इब्राहिम बेडेकर ते अलसफा मस्जिदपर्यंत पाईप गटार बांधकाम करणे. | ७०००० | २०२४-२५ | १ टक्के | ग्रामनिधी | २ महिने |
| ६ | मधला हाळ येथिल श्री. कमरुद्दीन बेडेकर यांचे घरापासून ते श्री. अजिज धतुरे यांचे घरापर्यंत पाईप गटार बांधकाम करणे. | ७०००० | २०२४-२५ | १ टक्के | ग्रामनिधी | २ महिने |
| ७ | मौजे हाळखुर्द येथिल श्री. अकिल दुस्ते यांचे घरापासून ते श्री. अब्दुल लतिफ करजीकर यांचे घरापर्यंत आर.सी. सी. गटार बांधकाम करणे. | ७०००० | २०२४-२५ | १ टक्के | ग्रामनिधी | २ महिने |

**अटी व शर्ती :**

१. सदरचे काम एमएसईबीचे तांत्रिक अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायतीच्या देखरेखीखाली पूर्ण करण्याचे आहे. सदर निविदाबाबत विस्तृत माहिती ग्रामपंचायत कार्यालयात हाळखुर्द येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.
२. काम पूर्ण झाल्यानंतर कामाच्या मुल्यांकन बिलातून ५ टक्के सुरक्षा अनामत २ टक्के विक्रीकर, २टक्के आयकर, १ टक्का मजुर विमा कामगार कल्याण सेस इत्यादी रकमा कपात केली जाईल.
३. कामाचे वेळी काही जिवितहानी झाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.
४. काम सुरु करण्यापुर्वीचे फोटो काम सुरु असतानाचे फोटो व काम पूर्ण झाल्यानतरचे फोटो सादर केल्याशिवाय बिलाची रक्कम अदा केली जाणार नाही.
५. पोष्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.
६. स्थानिक ठेकेदारांना प्रथम प्राधान्य दिले जाईल.
७. जीएसटी धारकांचेच अर्ज स्विकारले जातील.

**दिनांक : ०८/१०/२०२४**

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत हाळखुर्द**
**ता. खालापूर, जि. रायगड**




**खोपोली : शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८वर ठिकठिकाणी खड्डे पडलेले असल्याने अपघात होत आहेत. याची दखल घेत अपघातग्रस्त मदत टीम या सामाजिक संस्थेने पुढाकार घेत नगर परिषदेच्या सहकार्याने एक खड्डा हायको कॉर्नरजवळ बाबदेव मंदिरासमोर मुंबईकडील बाजूस पडला होता तो खड्डा नगरपालिकेचे कर्मचारी यांना सोबत घेऊन अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेच्या सदस्यांनी भरून काढला आहे. या खड्ड्यांमुळे वारंवार अपघात होत होते. वाहनचालकांनी गुरु साठीलकर व त्यांच्या सहकाऱ्यांचे तसेच नगर परिषदेचे आभार व्यक्त केले आहेत.**


**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे भेरले ता. पनवेल, जि. रायगड येथील जीजाबाई तुकाराम पाटील व इतर ४ यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

**परीशिष्ट**
**शेतजमीन जमिनीचे वर्णन**
**मौजे भेरले, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| जीजाबाई तुकाराम पाटील<br>जगन्नाथ तुकाराम पाटील<br>संतोष तुकाराम पाटील<br>प्रविण तुकाराम पाटील<br>राजश्री रामचंद्र म्हात्रे | ८८ | ३ | ०-४६-००<br>पो.ख.०-०५-९०<br>**एकुण ०-५१-९०** | ९.४४ |

सबब वर नमुद परीशिष्ट शेतजमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून २१ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तकार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक : ०४/१०/२०२४**

**सही/-**
**ॲड. विषय भगत ॲन्ड असोशिएटस्**
**(ॲडव्होकेट लिगल कन्सलटंट)**
**शॉप नं. १२८, नगरपालिका शॉपीग कॉम्पलेक्स,**
**पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९**
Email.vijaybhagat43@gmail.com



राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी



**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**
**जाहीर आवाहन शुध्दीपत्रक**

पनवेल महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता ६ वी व ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर सुधारणा उपक्रम राबविणेसाठी दिनांक ५/१०/२०२४ रोजीच्या राम प्रहार, किल्ले रायगड, रायगड नगरी या दैनिकामध्ये जाहीर आवाहन करण्यात आले होते. त्यामध्ये या उपक्रमासाठी एकूण २९९ विद्यार्थी ऐवजी ३९९ विद्यार्थी असे वाचावे.

**सही/-**
**उप आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

**जा. क्र/पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र. ५३२/५३४/२०२४**
**दिनांक ०८/१०/२०२४**



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
ई निविदा सूचना क्रमांक ४५/२०२४-२०२५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये कोटी |
|---|---|---|
| १ | दिघी बंदराभिमुख औद्योगिक क्षेत्र... दिघी बंदराभिमुख औद्यौगिक क्षेत्र ता. माणगाव व रोहा, जि. रायगड, महाराष्ट्र राज्य, येथील नियोजित अत्याधुनिक, पर्यावरण पूरक असे औषध उद्योगासाठी बल्क ड्रग पार्कचा विकास करणे तथा नियोजन करणे, देखभाल करणे, या कामासाठी खाजगी तथा सार्वजनिक उपक्रम यांचेकडून बांधा, वापरा व हस्तांतरीत करणे (PPP) या तत्वावर विकासक नेमण्यासाठी प्रस्ताव (RFP) मागविणे. | ₹०.०० |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक १०/१०/२०२४ ते दिनांक २१/११/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील. तसेच शक्य झाल्यास दि. २५/१०/२०२४ पासून सवलतीचा करारनामा (conssionaire agreement) महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

इच्छुकांनी सदर कामाबाबत दिनांक ०४/११/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. पुर्व अहर्ता बैठक दिनांक ११/११/२०२४ रोजी मुख्य अभियंता (मुख्या.), मऔविम, उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पुर्व), मुंबई-९३ यांचे कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा कामाबाबत दिनांक १४/११/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## निवडक

### उरण येथून तरुण बेपत्ता

**पनवेल :** कामठा उरण येथून एक जण पनवेला जात



असल्याचे सांगून निघाला तो अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार उरण पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. अजित श्रीरंग हुंबरे (वय ३२) असे या तरुणाचे नाव असून, चेहरा गोल, रंग सावळा, नाक सरळ, डोळे काळे, केस काळे, बांधा सडपातळ, उंची पाच फुट १० इंच असून, अंगात काळा टी-शर्ट व ऑफव्हाईट जिन्स घातलेली आहे. त्याच्या कपाळात जुन्या जखमेची खुण आहे. तसेच सोबत मोटरसायकल (एमएच-४६-एएस-००३४) व मोबाईल फोन आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उरण पोलीस ठाणे किंवा हवालदार सचिन होळकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला

**पनवेल :** तालुका पोलिसांना बालाजी पेट्रोल पंप समोर पोयंजे येथे जुना रोडच्या डिव्हायडर मध्ये ४० वर्षीय व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत सापडून आला. त्याला उपजिल्हा रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. या अनोळखी व्यक्तीची ओळख पनवेल तालुका पोलीस करत आहेत. त्याचा रंग गोरा, डोक्याचे केस काळे, उंची १७० सेंटीमीटर आणि दाढीचे केस वाढलेले आहेत. या इसमा बाबत अधिक माहिती असल्यास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुभाष मिस्तरी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कामिनी खाने हिचे अभिनंदन

**मोहोपाडा :** पुणे मराठी ग्रंथालय आयोजित पुस्तक परिक्षण स्पर्धेत कादंबरी गटामधील उत्कृष्ट परिक्षणाबद्दल रसायनी येथील खाने आंबिवली गावातील कामिनी सुरेश खाने यांना द्वितीय क्रमांक प्राप्त केला. कामिनी खाने यांनी कादंबरी पुस्तकाच्या केलेल्या परिक्षणामुळे संबंधित पुस्तकाचे अंतरंग वाचकांना सहजपणे उलघडले. पुस्तक परिक्षणाच्या निमित्ताने कामिनी खाने यांनी केलेल्या अभ्यासाचे प्रतिबिंब त्यांच्या परिक्षणात उतरले आहेत. त्याबद्दल त्यांचे पुणे मराठी ग्रंथालयाचे अध्यक्ष धनंजय बर्वे, कार्याध्यक्ष श्रीकांत देव यांनी अभिनंदन केले आहे.

### उरणमध्ये श्री सदस्यांकडून वृक्षारोपण

**उरण :** पर्यावरण विषयक जनजागृती करण्याच्या दृष्टीकोणातून व पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन करण्याच्या अनुषंगाने रविवारी डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या वतीने उरण तालुक्यातील करंजा गावातील नव्याने सुरू झालेल्या मच्छिमार गोदी येथे वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी मच्छिमार सोसायरी चेअरमन प्रदीप नाखवा, नवापाडा गाव अध्यक्ष मनोहर कोळी, दिलीप कोळी, नारायण नाखवा तसेच इतर सदस्य उपस्थित होते. या वेळी झाडे लावा झाडे जगवा, असा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देण्यात आला.

# आंतरराज्यीय सराईत गुन्हेगार गजाआड

## पनवेलसह नवी मुंबई व दिल्ली परिसरात टोळीचा धुमाकूळ

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलसह नवी मुंबई व दिल्ली परिसरात गंभीर गुन्हे करून धुमाकूळ घालणाऱ्या आंतरराज्यीय सराईत टोळीला मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेने गजाआड करून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात लाखो रुपये किंमतीचा ऐवज हस्तगत केला आहे.



दोन अज्ञात व्यक्तींनी महिलेच्या गळ्यातील १८ ग्रॅम वजनाचे मंगळसुत्र जबरीने हिसकावून काळ्या रंगाची केटीएम मोटार सायकलवरून पळून गेल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. त्याचप्रमाणे सीबीडी, खारघर, पनवेल शहर, कळंबोली, नेरूळ, वाशी, सानपाडा व कामोठे परिसरातदेखील अशा प्रकारचे गुन्हे दाखल करण्यात आलेले होते. याबाबतच्या तक्रारी संबंधित पोलीस ठाण्यात दाखल होताच पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, पोलीस सह.आयुक्त संजय ऐनपुरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) दीपक बाकोरे, पोलीस उपायुक्त अमित काळे आदींनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये महिला संबंधिच्या गुन्हयांना प्रतिबंध करणे व रस्त्यावर घडणाऱ्या गुन्ह्यांवर प्राधान्य आणण्यासंदर्भात गुन्हे प्रकटीकरण शाखेला सुचना केल्या.

यानुसार सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा अजय लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि मध्यवर्ती कक्ष सुनील शिंदे यांच्यासह सहाय्यक निरीक्षक श्रीनिवास तुंगेनवार, सतिश भोसले, सपोनि महेश जाधव, निलम पचार, उपनिरीक्षक राहूल भदाणे, सहाय्यक उपनिरीक्षक मंगेश वाट, हवालदार शशिकांत शेंडगे, महिला हवालदार उर्मिला बोराडे, हवालदार अनिल यादव, संजय राणे, महेश पाटील, नाईक सचिन टिके, निलेश किंद्र, राहूल वाघ, अजय कदम, महेश अहिरे, सतिश चव्हाण, नितिन परोडवाड आदींच्या पथकाने घटनास्थळी भेटी दिल्या.

समांतर तपास करून मोटरसायकल चोरी व चैन स्नॅचिंग उघडकीस आणणे करीता सुमारे एक आठवडा तांत्रिक तपास करून उलवे परिसरातून पाहिजे आरोपींचे छायाचित्र प्राप्त करून उलवे परिसरातील ४० ते ४५ सोसायट्या व गेस्ट हाउस तपासून आरोपी सागर जुगेश मेहरा (वय २७), अभय सुनिलकुमार नैन (वय १९), शिखा सागर मेहरा (वय २७), अनुज विरसींग छारी (वय २४) आदींना वेगवेगळ्या ठिकाणावरून या पथकाने ताब्यात घेतले असता त्यांचेकडुन नवी मुंबई परिसरात जबरी चोरीचे ०७ गुन्हे, वाहन चोरीचे ०२ गुन्हे व दिल्ली येथील १ गुन्हा असे एकुण १० गुन्हे उघडकीस आले आहेत.

आरोपी कमांक १ याचेविरूध्द दिल्ली येथे ३७ गुन्हे दाखल असुन १ गुन्हयात पाहिजे आरोपी आहे व त्याचेविरूध्द मा. न्यायालयाने ४ गुन्हयात जाहिरनामे प्रसिध्द केले आहेत. या आरोपींकडून आतापर्यंत १ सोन्याचे मंगळसुत्र, ३ सोन्याच्या चैन, २ तुटलेल्या सोन्याच्या चैनचे तुकडे असे एकुण ६६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, २ केटीएम मोटरसायकल असा एकुण किंमत ७,७०,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल हसतगत करण्यात आला आहे.



### दुर्गामाता दौड (माळ सहावी)

**पनवेल :** शारदेय नवरात्रोत्सवाचा सहाव्या दिवसानिमित्त दुर्गामाता दौड सी-५ राम मंदिर नवीन पनवेल येथून प्रेरणा मंत्र घेऊन सुरू करण्यात आली. पुढे मार्गक्रमण करीत सेक्टर १२, बी १०, सेक्टर १३, इ १ अशी करून दौड जय बजरंग मंडळाच्या मंडपात येऊन पोहचली. तेथे देवीचा गोंधळ घेण्यात आला. पुन्हा दौड मार्गक्रमण करीत सीकेटी शाळेकडून पोदीमध्ये अ‍ॅड. मनोज भुजबळ यांच्या मंडळाच्या मंडपात येऊन पोहचली. तेथे देवीची आरती श्लोक व गोंधळ घेण्यात आला. पुन्हा दौड सेक्टर ५ मधील राम मंदिराच्या इथे येऊन ध्येयमंत्र घेऊन या दौडची सांगता करण्यात आली.




**पनवेल : शुभम प्रभाकर जोशी यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच स्व. संदेश प्रभाकर जोशी व स्व. जितेंद्र कृष्णा जोशी यांच्या स्मरणार्थ पेठगाव बसस्थानकाचे उद्‌घाटन करण्यात आले. या समारंभास जोशी परिवार उपस्थित होता.**

## नेरेमध्ये महिलांसाठी खेळ पैठणीचा आणि लकी ड्रॉ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली लाडक्या बहिणींचा देवाभाऊ खेळ पैठणीचा आणि लकी ड्रॉ या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहेत. हा कार्यक्रम नेरेमध्ये आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून यात सहभाग घेतला.




कार्यक्रमाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुका अध्यष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, उपाध्यक्ष संजय पाटील, राजेंद्र पाटील, युवानेते दशरथ म्हात्रे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटीलम, राज पाटील, वासुदेव गवते, सरपंच आनंद ढवळे, सरपंच प्रकाश घाडगे, सिताराम चौधरी, प्रतिभा भोईर, शिल्पा म्हात्रे, माजी नगरसेविका नीता माळी, माजी सरपंच राजश्री राजाराम मस्कर, रंजना नरेश पाटील, माजी उपसरपंच नीलिमा निलेश पाटील, उपसरपंच दिनेश मानकाने, राम पाटील, शैलेश जाधव, छाया संजय पाटील, रजनी भरत ठाकूर, वंदना रोड पालकर, कल्पना वाघे, शांताराम चौधरी, जोमा निरगुडा, सावित्री रामा पाटील, रेखा घाडगे, संगीता जोशी, निलेश पाटील, रोहन पाटील, डॉक्टर रोशन पाटील, संगीता प्रल्हाद पाटील, जयश्री पाटील, वर्षा विनोद पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्य धनश्री पाटील, अनुराधा विष्णू वाघमारे, राणी विलास शिनारे आदी उपस्थित होत्या.

## लायन्स क्लबतर्फे पाच रुपयांत ब्रेड-बटर

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

लायन्स क्लब ऑफ कामोठेच्या वतीने मानसरोवर रेल्वे स्थानकासमोर मारुती मंदिर येथे ना नफा ना तोटा या तत्त्वावर पाच रुपयात ब्रेड-बटरची विक्री करण्यात येत आहे. पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या उपस्थितीत व लायन्सच्या ए-४ डिस्ट्रिक्टचे प्रांतपाल एन. आर. परमेस्वरन यांच्या हस्ते उपक्रमाचा शुभारंभ झाला.



दर शनिवारी सकाळी साडेआठच्या सुमारास पाच रुपयांत दोन स्लाइस ब्रेड-बटरचे मिळणार आहेत. या वेळी कामोठे क्लबचे अध्यक्ष अरुणा सावंत, सचिव सुजाता बत्तीन, उमंग देसाई, विजय गणात्रा, मूर्ती, एस.जी. चव्हाण, प्रकल्प समन्वयक हेमंत लोणकर, रमाकांत म्हात्रे, संगीता म्हात्रे, राजेशकुमार, जग्यासिनी बक्षी, रशीदा भगत तसेच कामोठे क्लबचे अध्यक्ष अरुणा सावंत, खजिनदार विवेक महाजन, प्रथम उपाध्यक्ष ललिता गुप्ता,सह खजिनदार संदेश महाडिक, तसेच सभासद नरेश गुप्ता, गोवारी, जाजू, दिलीप कांबळे, संगीता जेठे, निता मोहिते, चिमाजी शिंदे आदी उपस्थित होते.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात गरबा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवरात्र उत्सव म्हटला की सर्वत्र गरबा नृत्याचे उत्साही वातावरण असते. रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात सोमवारी (दि.७) नवरात्र उत्सवानिमित्त सरस्वती मातेचे पूजन आणि गरबा नृत्याचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर, विद्यालयाच्या उपशिक्षिका पल्लवी पवार, वेदांगी म्हात्रे, विशाखा गावंड, आशा कस्पटे व लेखनिक भारती कोळी यांनी विद्यार्थ्यांच्या बरोबर देवीच्या अनेक रूपांमधील एक रूप विद्येची आराध्य देवता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन व आरती केली.नंतर विद्यार्थ्यांनी वर्तुळाकार रिंगणात फेर धरून गरबा नृत्याचा मनमुराद आनंद घेतला.

या वेळी उत्कृष्ट वेशभूषा, उत्कृष्ट नृत्य यासाठी विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांच्याकडून बक्षीस देण्यात आली.

या वेळी उत्कृष्ट वेशभूषेचे बक्षीस इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी राशी कैलास खारकर हिला तर उत्कृष्ट नृत्याचे बक्षीस कुमारी सदिच्छा अमित अडसुळे या विद्यार्थिनीला मिळाले.



## इनरव्हील क्लबतर्फे दापोली विद्यालयात माता पालक मेळावा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दापोली येथील भोईर विद्यालय व रघुनाथशेठ जितेकर ज्युनिअर कॉलेज येथे पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या एक १३७व्या जयंती सोहळ्यानिमित्त विद्यालयाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. इनरव्हील क्लब ऑफ पनवेल यांनी शाळेच्या नावलौकिकात भर टाकेल असा माता पालक मेळावा आयोजित करून मुलींच्या आरोग्यासंबंधी मोलाची माहिती दिली.

या सोहळ्यासाठी जवळजवळ ५०० माता पालक आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या. पीपी अ‍ॅड. सुजाता चव्हाण यांनी पालकांनी मुलगी वयात येताना कोणकोणती काळजी घ्यायची या संदर्भात सुमारे तासभर मार्गदर्शन केले. सर्व माता पालक ग्रामीण भागातील असल्यामुळे त्यांना ही माहिती अतिशय उपयुक्त वाटली. यानंतर इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्ष डॉ. विना मनोहर यांनी मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या विषयावर व्याख्यान दिले.

डॉ. विना यांनी वयात येणाऱ्या मुलींसाठी सर्व्हाइकल कॅन्सरबद्दल सविस्तर माहिती देऊन तो होऊ नये यासाठी देण्यात येणाऱ्या लसीबद्दल सविस्तर माहिती दिली आणि आपल्या मुलींना ही लस देण्याचे



आवाहन केले. यानंतर सर्व मातांच्या मनातील शंकांचे निरसन केले व या संदर्भात संपूर्ण माहिती दिली.

या उपक्रमासाठी सेक्रेटरी अंजली कुलकर्णी, पास्ट प्रेसिडेंट सुलभा निंबाळकर आणि वर्षाताई ठाकूरसुद्धा उपस्थित होत्या. वर्षाताईंनीसुद्धा पालकांना आवाहन केले की, आपल्या मुलीची आरोग्याची काळजी आपण ही लस देऊन पूर्ण करू शकतो व त्यांच्या उज्वल भविष्यासाठी हे फार महत्त्वाचे आहे, असे सांगितले. या संदर्भातील संपूर्ण जबाबदारी इनरव्हील क्लब ऑफ पनवेल उचलणार आहे तसेच ही लस विद्यार्थिनींना संपूर्णपणे मोफत देण्यात येईल व त्यासाठी येणारा खर्च इनरव्हील क्लब ऑफ पनवेल उचलणार आहे. यानंतर मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने उपयुक्त असे सॅनिटरी पॅड शाळेकडे क्लब अध्यक्षांनी सुपूर्द केले.

संपूर्ण कार्यक्रम अतिशय नियोजन पद्धतीने पार पाडला. याचे संपूर्ण श्रेय विद्यालयाच्या प्राचार्य पुष्पलता ठाकूर यांना जाते. त्यांनीही आपल्या आभार प्रदर्शनाच्या भाषणात इनरव्हील क्लब ऑफ पनवेलचे आभार मानून पालकांना पुन्हा या लसीचे महत्त्व पटवून दिले.

# नागोठण्यात शेकापला धक्का

## कोंडगाव सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि ग्रामस्थ भाजपमध्ये



**नागोठणे : प्रतिनिधी**

भाजप नेते खासदार धैर्यशील पाटील यांच्या कार्यप्रणालीवर आकर्षित होऊन नागोठणे परिसरातील कोंडगाव ग्रामपंचायतीचे आजी माजी सरपंच, सदस्य व ग्रामस्थांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

कोंडगाव ग्रामपंचायत हद्दीतील गावांच्या विकासाबाबत खासदार धैर्यशील पाटील यांच्याशी सकारात्मक चर्चा झाल्यानंतर शेकापचे ज्येष्ठ नेते अनंत वाघ व युवा नेते निखिल मढवी यांच्या नेतृत्वाखाली शेकापचे कोंडगाव ग्रामपंचायत सरपंच, माजी सरपंच, उपसरपंच, माजी उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थांनी भाजपमध्ये प्रवेश केला. सर्व प्रवेशकर्त्यांचे भाजपमध्ये स्वागत करून आपल्या विविध अडचणी सोडविण्यासाठी मी कटीबद्ध असल्याचे अभिवचन खासदार धैर्यशील पाटील यांनी प्रवेशकर्त्यांना दिले.

खासदार धैर्यशील पाटील यांच्या पेण तालुक्यातील वाक्रूळ येथील निवासस्थानी शेकापचे ज्येष्ठ नेते, कोंडगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य अनंत वाघ, माजी सरपंच व विद्यमान सदस्य निखिल मढवी, सरपंच प्रणाली मढवी, उपसरपंच यशवंत शिद, बाळाराम मढवी, युवा नेते नितीन राजीवले, एकनाथ राजीवले, सदानंद शिंदे, मधुकर मालुसरे, सुशील राजीवले, गणेश केदारी, तुकाराम शेडगे, उमेश मढवी, देवजी म्हात्रे, भूषण मढवी, विशाल मढवी, भगवान मढवी, लक्ष्मण नाईक, विलास मढवी, शशिकांत मढवी, नथुराम मढवी, सुभाष मढवी, विजय म्हात्रे, अनिकेत मढवी, रजनीकांत मढवी, माजी उपसरपंच गोविंद हंबीर, यशवंत भस्मा, रामजी हंबीर, जयराम भस्मा, हरी शिंगवा, माजी उपसरपंच हुमा हंबीर, बाळू खंडवी, तानाजी पिंगळा, रामजी हंबीर, विठ्ठल वाघमारे, शांताराम वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य प्रमिला खंडवी, कमल बुरुमकर, शेवंती भस्मा, रोहिणी शिद आदी शेकापच्या प्रमुख कार्यकर्त्यांसह ग्रामस्थांनी भाजपत प्रवेश केला.

या कार्यक्रमास भाजपचे रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, एकनाथ ठाकूर, ज्येष्ठ कार्यकर्ते दगडू दळवी, क्रीडा संयोजक शेखर गोळे, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस मोरेश्वर म्हात्रे, शिक्षण सेल तालुका उपाध्यक्ष धनराज उमाळे आदी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# तेलवडे-शिघ्रे रस्ते प्रकाशमान

## आमदार महेंद्र दळवींकडून पथदिव्यांची सुविधा

**मुरूड : प्रतिनिधी**



आमदार महेंद्र दळवी यांनी मुरुडनजिकच्या तेलवडे ते शिघ्रेपर्यंतच्या रस्त्यावर स्वखर्चाने पथदिव्यांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

नऊगाव आगरी समाजातील लोकांना रात्री बेरात्री आजारपण, अंत्यविधी तसेच अन्य अन्य कामासाठी जावे लागते. या ग्रामीण भागातील बऱ्याच महिलांना कामधंद्यासाठी वा बाजारहाटासाठीही मुरूडला चालत यावे लागते. विशेषतः रात्री रस्त्यावरून सरपटणाऱ्या प्राण्यांची भीती वाटते.

या सर्व बाबींचा विचार करून तेलवडे, शिघ्रे, नवीवाडी, वाणदे, जोसरांजण, आंबोली आदी नऊ गावांच्या आगरी समाजाने आमदार दळवी यांच्याकडे रस्त्यावर पथदिव्यांची समस्या मांडली. आमदार दळवी यांनी तत्काळ ग्रामस्थांना याबाबत शब्द दिला आणि त्यानुसार पंधरा दिवसात तेलवडे ते शिघ्रे गावापर्यंत रस्त्यावर पथदिव्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे हा रस्ता प्रकाशमान झाला आहे. या पथदिव्यांचे काम शिघ्रे पोलीस चौकी ते खारआंबोलीपर्यंत प्रगतिपथावर आहे. दरम्यान, पथदिव्यांची उत्तम सोय झाल्यामुळे नऊगाव पंचक्रोशीने आमदारांचे आभार व्यक्त केले आहेत.

या संदर्भात प्रतिक्रिया देताना जिल्हा शिवसेना संघटक दिनेश मिनमिणे यांनी म्हटले की, मुरूड शहरात विविध विकासकामे आमदार महेंद्र दळवी यांनी केली असून ग्रामीण भागाचादेखील सर्वांगीण विकास करण्याचे त्यांचे सर्वतोपरी प्रयत्न आहेत.

या वेळी शिवसेनेचे मुरूड उपतालुकाप्रमुख मनोज कमाने, युवा नेते दीपेश वरणकर आदी उपस्थित होते. रस्त्यावर विद्युत दिवे बसल्याने रात्रीच्या समयी प्रवास करणे ग्रामस्थांना सुलभ झाले आहे.

# वावडुंगी ग्रामपंचायतीच्या शेकाप सदस्याचा शिवसेनेत प्रवेश

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील वावडुंगी ग्रामपंचायतीमधील शेतकरी कामगार पक्षाचे ग्रामपंचायत सदस्य सरफराज कडू यांनी आमदार महेंद्र दळवी यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. कडू यांचे समर्थकसुद्धा शिवसेनेचे काम करणार आहेत.



या वेळी आमदार महेंद्र दळवी यांनी आश्वासित केले की, वावडुंगी ग्रामपंचायत विकासकामे राबवण्यात कमी पडणार नाही. केंद्र व राज्य शासनाचा भरघोस निधी मी उपलब्ध करून देणार आहे. त्याचप्रमाणे योग्य वेळेत कडू यांनी प्रवेश केल्याबद्दल त्यांनी धन्यवाद व्यक्त व स्वागत करून गावाच्या विकासात कोठेही कमी पडणार नसल्याचे सांगितले.

शिवसेनेचे जिल्हा संघटक दिनेश मिनमिणे यांनी सांगितले, आज मुरूड शहर व ग्रामीण भागात आमदार दळवी यांनी मोठा फंड उपलब्ध करून दिल्याने या भागाचा मोठा विकास झाला आहे. सरफराज कडू यांनी शिवसेनेत प्रवेश करून आम्हाला ताकद देण्याचे काम केले आहे. पक्षाकडून त्यांच्या ज्या अपेक्षा आहेत त्या निश्चित पूर्ण होतील.

या कार्यक्रमास शिवसेनेचे युवा नेते व वावडुंगी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच दीपेश वरणकर, तेलवडे ग्रामपंचायत उपसरपंच निलेश तांबडकर उपस्थित होते.

# वैदेही दिवेकरने केला पंतप्रधानांसमवेत मेट्रो प्रवास

**नागोठणे : बातमीदार**

कोलाड येथील रहिवासी व पाटबंधारे विभागातील निवृत्त अधिकारी सुभाष मोरे, निवृत्त शिक्षिका सुवर्णा मोरे यांची नात आणि माणगाव कोर्टात प्रॅक्टिस करीत असलेल्या वकील सुषमा दिवेकर यांची सुकन्या एसएनडीटी कॉलेज मुंबईची विद्यार्थिनी वैदेही सुहास दिवेकर हिला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमवेत मेट्रो मध्ये प्रवास करण्याचे भाग्य लाभले. याबाबत रायगड जिल्ह्यातील नाभिक समाज बांधवांनी वैदेहीचे अभिनंदन केले.



मुंबईतील कुलाबा वांद्रे सिप्झ या ३३.५ किमी मेट्रो मार्गिकेचे शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर पंतप्रधान मोदींनी मेट्रो प्रवासाचाही अनुभव घेतला. या प्रवासादरम्यान पंतप्रधानांनी शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या वेळी या शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैदेही दिवेकर हिला संधी मिळाली होती. तिने पंतप्रधानांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तरही दिले. या प्रवासात एका विद्यार्थिनीनी गिटारदेखील वाजविले. पंतप्रधानांनी सर्व विद्यार्थ्यांचे तोंडभरून कौतुक केले.

मेट्रोकडून मुंबई विद्यापीठाला निमंत्रण देण्यात आले होते. त्यानंतर विद्यापीठाने पाठविलेल्या अनेक विद्यार्थ्यांमधून मेट्रो व्यवस्थापनाने फक्त पाच विद्यार्थी निवडले आणि त्यामध्ये एसएनडीटी कॉलेजची विद्यार्थिनी असलेल्या वैदेही दिवेकर हिची निवड झाल्याची माहिती वैदेहीची आई ॲड. सुषमा दिवेकर यांनी दिली.

# 'माझी वसुंधरा, आयएसओ सन्मानात ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा सिंहाचा वाटा'

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील तांबाटी ग्रुप ग्रामपंचायतीने माझी वसुंधरा अभियानात कोकण विभागातून प्रथम क्रमांक प्राप्त केला असून त्यांना रायगड जिल्हा परिषदेकडून आयएसओ हे नामांकनदेखील प्राप्त झाले आहे. याचे सर्व श्रेय आपल्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे असल्याची भावना सरपंच आम्ले व ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम यांनी व्यक्त केली.



विशेष म्हणजे आयएसओ नामांकन प्राप्त करणारी खालापूर तालुक्यातील तांबाटी ही एकमेव ग्रामपंचायत आहे, तर माझी वसुंधरा अभियान हे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पर्यावरणाच्या संवर्धनासाठी निसर्गाच्या पंचतत्वावर आधारलेले आहे. या अभियानात दोन हजार ५०० ते पाच हजार लोकसंख्या असलेल्या गटात खालापूर तालुक्यातील तांबाटी ग्रामपंचायतीने कोकण विभागात पहिला, तर राज्यात सातवा क्रमांक पटकाविला. यासाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. त्यांची मेहनत फळाला आली, असे ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम यांनी म्हणाले.

याचबरोबर शासन स्तरावर पारदर्शकता, कामात गतिमानता यासाठी ई-गव्हर्नन्स प्रणालीचा वापर करून विविध विभागांचे रजिस्टर, फॉर्म्स भरून घेणे, येणाऱ्या व होणाऱ्या दस्तांचे संगणकीकरण, पेपरलेस काम करणे, कागदपत्रांचे पुनर्विलोकन करणे तसेच ग्रामपंचायत कार्यालयाचे सुशोभीकरण, ग्रामपंचायत रेकॉर्ड अद्यावत ठेवणे, स्वच्छता, पाणीपुरवठा, झाडे लावा झाडे जगवा संदेश, शासकीय योजनांची अंमलबजावणी व माहिती देणे अशी अनेक प्रकारची कर्तव्ये आमच्या कर्मचाऱ्यांनी अतिशय उत्साही वातावरणात व चांगल्या पद्धतीने केल्यामुळे आम्ही हे यश प्राप्त केल्याचे उपसरपंच आणि सदस्य यांनी सांगितले.

# रूद्रा ठरली उत्कृष्ट खेळाडू

**रेवदंडा : प्रतिनिधी**

धुळे येथे नुकत्याच झालेल्या पाचव्या राज्यस्तरीय लाठी स्पर्धेत अलिबागच्या सहा वर्षीय रुद्रा विनय पिळणकर हिने तीन सुवर्ण व एक रौप्यपदकासह लहान गटात उत्कृष्ट खेळाडू ही ट्रॉफी पटकावली.

रूद्राने लाठीच्या एकम, पंचम लाठी, द्वि अनिखम प्रकारात सुवर्ण आणि द्वे लाठी प्रकारात रौप्यपदक जिंकले. या कामगिरीबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे

रूद्रा ही अलिबाग येथील केईएस इंग्लिश मीडिएम स्कूलची विद्यार्थिनी आहे. शाळेच्या वतीनेही तिचे अभिनंदन होत आहे. रुद्राला या खेळासाठी प्रशिक्षक प्रियंका गुजांळ, वेदांत सुर्वे यांचे प्रशिक्षण लाभले.



# खालापुरात ग्रामदेवता साबाई मातेचा जागर

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

वर्षानुवर्षे चालत आलेल्या परंपरेनुसार खालापूरची ग्रामदेवता आई साबाई माता मंदिरात यंदाही नवरात्रोत्सव व साबाई मातेचा पालखी सोहळा मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात येत आहे.

आई साबाई मातेचे मूळस्थान मुंबई-पुणे हायेवलगत ढापनी गडावर आहे. दरवर्षी हनुमान जयंतीला साबाई मातेचे मूळ स्थान असलेल्या ढापनी गडावर खालापूर ग्रामस्थ जात असतात. नवरात्रीच्या उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन मंदिरात केले जाते. यामध्ये दररोज रात्री भजन केले होते. त्याचबरोबर सप्तमीला रात्री १२ वाजता साबाई मातेची महाआरती केली जाते. अष्टमीला मंदिरात नवचंडी होम होतो. पूर्वापार चालत आलेल्या परंपरेनुसार दसऱ्याच्या दिवशी मामलेदार (तहसीलदार) यांच्या हस्ते मंदिरात आपट्याची पाने रचून त्याची पूजा केली जाते. पूजेनंतर सोने लुटण्याचा कार्यक्रम होत असतो. हे सोने लुटल्यांतर प्रथम ते देवीला अर्पण करून नंतर एकमेकांना दिले जाते.



दसऱ्याच्या दिवशी संपूर्ण गावात रात्री पालखीचे जागोजागी ग्रामस्थ स्वागत करतात व भक्तिभावाने दर्शन घेतात. नववधू व माहेरपणाला आलेली लेक देवीची ओटी भरूनच गावाची वेस ओलांडते. नवरात्रीमध्ये खालापूर गाव व पंचक्रोशीतील भाविक तसेच परराज्यातूनही मोठ्या प्रमाणात भक्त देवीची ओटी भरण्यासाठी आई साबाई मंदिरात येतात.

देवीचा सोहळा साजरा करण्यासाठी नागरिक मेहनत घेत आहेत. नित्यनेमाने देवीची रोजची पूजा-अर्चा पुजारी राजू देसाई व त्यांच्या मातोश्री सरिता देसाई करतात, तर त्यांना मदत म्हणून दीपक जगताप सहकार्य करतात.

# चौलचे शितळादेवी मंदिर जागृत देवस्थान

चौल म्हणजे प्राचीन चंपावतीनगरी. प्राचीन काळी चौलमध्ये ३६० मंदिरे असल्याचा उल्लेख सापडतो. त्यामुळे चौलला अन्ययसाधारण पौराणिक महत्त्व असून येथील अनेक मंदिरे जागृत असल्याची महती आहे. संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्धीस असलेले चौलचे शितळामाता मंदिर त्यापैकीच एक आहे. भक्तांना कौल देणारे जागृत देवस्थान म्हणून ते आजही भाविकांचे श्रद्धास्थान आहे.



चौल या दक्षिणेकडील प्राचीन नगरीत आंबेपुरी पाखाडीत हिरव्या गर्द नारळ पोफळीच्या छायेत शितळादेवीचे भव्य मंदिर आहे. अलिबागपासून १८ किमी अंतरावर असलेल्या चौलनाका येथून आग्रावकडे जाणाऱ्या रस्त्यामध्ये शितळामाता मंदिर आहे. चौलनाक्यापासून दीड ते दोन किमी अंतरावर असलेल्या या मंदिरास जाण्यासाठी रिक्षाने प्रवास करावा लागतो अथवा अलिबाग येथून थेट आग्राव एसटीने शितळादेवीच्या मंदिराकडे जाता येते.

पूर्वीची स्थिती लक्षात घेता हे मंदिर चौलच्या दक्षिण खाडीजवळ बांधले होते, परंतु आता जवळपास खाडी भरून बरीच जमीन वाढली आहे. या देवतेवर आंग्रे घराण्याची दृढ श्रद्धा होती. आंग्रे काळातच १७५९मध्ये या मंदिराचा जीर्णोध्दार झाल्याचे लिखीत मिळते. या मंदिराचा प्रथम जीर्णोद्धार इ.स. १५८मध्ये बाबूभट उपाध्ये यांनी द्रव्य मिळवून केल्याची नोंद आहे. १७६७मध्ये विसावी सरसुभेदार यांनी ब्राम्हण भोजन घातले. १७८५मध्ये एप्रिलच्या सुमारास राघोजी आंग्रे कुटूंबासह देवीच्या दर्शनाला आले होते, तर १७९२च्या ऑक्टोबर महिन्यात मुलाबद्दलचा नवस फेडण्यासाठी आले होते. त्या प्रसंगी हत्ती, घोडे, सरंजाम, व काही लष्कर बरेच दिवस तळ ठोकून या ठिकाणी राहिले होते. १८०५मध्ये बाबूराव आंग्रे दर्शनाला आल्याचा उल्लेख असून दरवर्षी दसऱ्याच्या दिवशी आंग्रे कुटूंब दर्शनाला न चुकता येई व देवीच्या रक्षकाचा मान देत असत.

पूर्वीचे आंग्रेकालीन लाकडी व कौलारू मंदिर आता पाडून त्या वास्तूतील मूर्तीची जागा न बदलता ग्रामस्थांनी जीर्णोद्धार समिती नेमून २७ मार्च १९९० रोजी गुढीपाडव्याच्या मुर्हूतावर नवीन सिमेंट क्राँक्रटीटचे मंदिर बांधण्यास सुरुवात केली. मार्च १९९७मध्ये रायगडचे तत्कालीन जिल्हाधिकारी रघुनाथ राठोड यांच्या हस्ते जीर्णोद्धाराचे काम पूर्ण झाल्याने उदघाटन करण्यात आले.

चौलची शितळादेवी अनेक कुटुंबांची कुलदैवत आहे. रविवार, मंगळवार, गुरुवात व शुक्रवार या दिवशी भाविकांची मोठी गर्दी पहावयास मिळते, तर मंगळवार व शुक्रवार या दिवशी भाविक मनातील इच्छा अथवा अडचणी या विषयी देवीचा कौल मागतात. या मंदिराच्या बाहेर उजव्या हाताव्या हाताला गुलमादेवी, खोकलादेवी, व खरूजादेवीच्या मूर्ती आहेत. जर कोणाला गुलमा झाल्या असेल तर तो जाण्यासाठी गुलमादेवीला ओटी भरणे, कोणाला खोकला झाला असेल तो जाण्यासाठी तर खोकलादेवीची ओटी भरणे आणि कोणाला खरूज झाली असेल तर ती जाण्यासाठी खरूज देवीची ओटी भरून शितळामातेचा आशीर्वाद भाविक घेतात. शितळामातेच्या मंदिराच्या समोरील पुष्करणीतील पाण्याने पाय धुवूनच मंदिरात प्रवेश घेण्याची प्रथा आहे तसेच विविध रोगांपासून सुटका होण्यासाठी या पुष्करणीतील पवित्र पाण्याने आंघोळ करण्याची श्रद्धा भाविक अद्याप ठेवून आहेत. परिसरात असलेल्या गोळबादेवी व भरडादेवी या शितळामातेच्या उपदेवता असल्याचे सांगितले जाते.

सागर तीरावरील चंपावतीनगरीत देवीची उपासक असलेल्या सुंदर, सुशील, निर्मळ, उदार, धर्मशील, कोमल, मनाच्या चंपावती राणीचे राज्य होते. चंपावती नगराला समुद्राचा वेढा होता. समुद्राच्या लाटाने चंपावती नगरीची तटबंदी सारखी तुटून नुकसान होत असे. समुद्राचे पाणी येण्याचे संकट दरवर्षी येत होते. त्यामुळे राणी हतबल होऊन दुखी होई. राणीचा दिवस व रात्र प्रजा व राज्य यांच्या चिंतेत जाई. महासागरापुढे काय करावे असा प्रश्न सातत्याने राणीच्या मनात निर्माण होई. बरेच दिवस लोटल्यावर राणीने एकांतात अनुष्ठानास आरंभ केला. मौनव्रत पाळून देवीच्या उपासनेला सुरुवात केली. असे नवरात्रीचे आठ दिवस गेले. अखेर राणीच्या उपासनेला यश आले. शितळामाता प्रत्यक्ष प्रकट होऊन राणीला म्हणाली, चंपावती काय संकट आहे, सागारावर माझी सत्त आहे. मला शितळामाता म्हणतात. त्यावर राणीने सागरापासून होणाऱ्या त्रासाबद्दलची कहाणी देवीला कथन केली. या सागराच्या संकटापासून नगरीचे रक्षण कर असे सांगताच देवीने क्षणही न घालवता माझ्या शक्तीने सागराला शांत करेन असे म्हणत हातातील तुंबर सागरावर फेकला व सागर अडवला. मग सागर भयभीत होऊन शितळामातेस शरण आला व यापुढे चंतावती नगरीला कोणत्याही प्रकाराचा त्रास होणार नाही असे वचन सागराने देवीला दिले आणि शितळामातेस राज्य करण्यासाठी सिंहासनी बसवले.

पूजापात्र घेऊन मातेची पूजा करून निर्मळ गंगाजळ, हळदकुंकू, आभूषणे, कनक, वस्त्र, श्रीफळ सागराने अर्पण केले. त्यापासून देवीचे स्थान या चंपावतीनगरीत निर्माण झाले. शितळादेवीचा दरबार देवदेवतांचे माहेरघर आहे. देवदेवता दर्शनासाठी येऊ लागल्या अशी पौराणिक कथासार आख्यायिका सांगितली जाते.

या मंदिर परिसरात देवीची ओटी भरण्यासाठी साहित्य विक्री करण्यासाठी विक्रेते आहेत. तेथे नारळीपाक, चिक्की, तसेच बकुळीचे गजरे विक्रीस ठेवले जातात. त्यांची खरेदी करण्यास महिलांची गर्दी असते. चौलनाका ते शितळादेवी मदिरापर्यंत अनेक घरगुती कॉटेज असून तेथे रहाण्याची व जेवण्याची सोय असते. भक्तांना कौल देणाऱ्या चौल येथील शितळामातेच्या जागृत देवस्थानास असंख्य भाविक नित्याने भेट देत असतात. सध्या नवरात्रोत्सव सुरू असल्याने भाविकांची गर्दी होताना दिसत आहे.

**-महेंद्र खैरे,** रेवदंडा

